RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
* मुख्य संपादक : अमोल कंटाळे

अमरावती, गुरुवार, १५ मे २०२५ | * वर्ष ४ | * अंक ३३६ | * पृष्ठ ६ | भाषा : मराठी | * मूल्य : ३.०० रुपये

## लाचखोर पोलिस हवालदार एसीबीच्या जाळ्यात



नागपूर येथील एका रहिवाशाने लाखनी येथे खरेदी केलेल्या घराचा ताबा मिळवून देण्यासाठी २० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या लाखनी पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई १४ मे रोजी लाखनी येथे करण्यात आली. राजेश निलकंठराव भजने (वय ४९, रा. समर्थ नगर, लाखनी) असे अटक करण्यात आलेल्या लाचखोर पोलिसाचे नाव आहे. सदर तक्रारदार नागपूर जिल्ह्यात वास्तव्यास असून, त्यांनी २०१८ मध्ये लाखनी येथे एक घर खरेदी केले होते. मात्र, १७ एप्रिल रोजी एक महिला आणि तिच्या मुलाने घराचे कुलूप तोडून बेकायदेशीर ताबा घेतला. यानंतर तक्रारदाराने लाखनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी १८ एप्रिल रोजी संबंधित महिला व तिच्या मुलाविरोधात गुन्हा दाखल केला. त्यानंतर, घराचा ताबा मिळवून देण्यासाठी पोलीस हवालदार राजेश भजने यांनी तक्रारदाराकडे २० हजार रुपयांची लाच मागितली. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा यांच्याकडे तक्रारदाराने २२ एप्रिल रोजी तक्रार दाखल केली. त्यानुसार झालेल्या पडताळणीत आरोपी हवालदाराने पहिल्या हप्त्याच्या स्वरूपात ५ हजार रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शवली.

### महत्त्वाचे...

**वाघाच्या हल्ल्यात पतीसमोर पत्नी ठार**

**चंद्रपूर :** तेंदूपत्ता तोडण्यासाठी जंगलात गेलेली आणखी एका महिला वाघाच्या हल्ल्यात ठार झाली. वाघाने हल्ला केला तेव्हा तिच्या आईवडिलांसह पतीही समोरच होता. त्यांनी वाघाला हुसकावण्यासाठी आरडाओरडही केली. मात्र ते तिचा बचाव करण्यात अपयशी ठरले. ही घटना सोमवारी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास मूल तालुक्यातील भादुर्णा बिटातील ७९३ मध्ये घडली. भूमिका दीपक भेंडारे असे मृत विवाहितेचे नाव आहे. सोमवार, १२ मे रोजी भूमिका तिचे आई, वडील, काका, काकू व पतीसह तेंदूपत्ता तोडण्यासाठी भादुर्णाच्या जंगलात गेली होती. तेंदूपत्ता तोडत असतानाच तिच्या पतीसमोरच वाघाने हल्ला केला. यात ती जागीच ठार झाली. घटनेनंतर मृतदेह उचलण्यास मृताच्या कुटुंबीयांनी नकार दिल्याने तणावाची स्थिती निर्माण झाली होती.

# महाराष्ट्रात 5 हजार 127 कोटींची थेट परकीय गुंतवणूक

## 27 हजार 510 रोजगाराच्या संधी, सरकारचा ब्लॅकस्टोन समूहासोबत सामंजस्य करार

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र शासन तसेच ब्लॅकस्टोन समूहाच्या एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्स आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्स यांच्यात आज महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. हा करार राज्यातील प्रमुख औद्योगिक आणि मल्टिमोडल लॉजिस्टिक क्षेत्रांमध्ये आधुनिक लॉजिस्टिक्स आणि इंडस्ट्रियल पार्क्सच्या विकासासाठी होणार आहे.

या करारानुसार महाराष्ट्रात 10 हून अधिक आधुनिक औद्योगिक व लॉजिस्टिक्स पार्क्स उभारले जाणार आहेत. यासाठी 794.2 एकर जमिनीचे क्षेत्रफळ आहे. यापैकी 1.85 कोटी चौ. फूट जमिनीवर बांधकाम करण्यात येईल. या सर्व प्रकल्पांमध्ये मिळून एकूण थेट परकीय गुंतवणूक ही 5 हजार 127 कोटी रुपये आहे. या करारामुळे थेट व अप्रत्यक्ष अशी एकूण 27 हजार 510 रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे.

हे लॉजिस्टिक्स पार्क्स नागपूर, भिवंडी, चाकण, सिन्नर, पनवेल यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी विकसित केले जाणार आहेत. हे प्रकल्प पर्यावरणस्नेही, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरयुक्त व रोजगार निर्मितीस प्रोत्साहन देणारे असून, महाराष्ट्र लॉजिस्टिक्स धोरण 2024 शी सुसंगत असेल. ही परिवर्तनात्मक भागीदारी नागपूर, मुंबई, पुणे आणि इतर ठिकाणी जागतिक दर्जाचे, पर्यावरण, सामाजिक आणि शासकीय अनुकूल असे औद्योगिक व लॉजिस्टिक्स हब्स तयार करण्याच्या दिशेने पाऊल टाकणारी आहे. भारतातील उत्पादन, वेअरहाउसिंग व पुरवठा साखळी उत्कृष्टतेसाठी एक सशक्त पायाभूत रचना ही परिवर्तनत्मक भागीदारी निर्माण करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उद्योग सचिव डॉ.पी.अन्बळगन आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्सचे अध्यक्ष आर.के. नारायणन यांच्या स्वाक्षरीत हा करार झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासू, उपसचिव लक्ष्मीकांत ढोके, ब्लॅकस्टोन ॲडहायझर्स प्रा. लि.चे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक तुहिन पारिख, ब्लॅकस्टोन ॲडव्हायझर्स प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक आलोक जैन, एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्सचे व्यवस्थापकीय संचालक आशीष अग्रवाल आदी उपस्थित होते.



## भारत झुकणार नाही, हे ऑपरेशन सिंदूरने दाखविले

### पाकिस्तानला भारतीय सैन्याची ताकद दिसली - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** भारतीय सेनेने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर यशस्वीपणे राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर या धाडसी मोहिमेच्या पार्श्वभूमीवर देशभरात उत्साहाचे वातावरण आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल भारतीय सेनेचे आभार मानण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने महाराष्ट्रात तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून मुंबईत आज भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. मुंबईच्या ऑगस्ट क्रांती मैदानावर या रॅलीचा समारोप झाला.

या समारोप सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप नेते आशिष शेलार, पंकजा मुंडे, मंगलप्रभात लोढा, प्रवीण दरेकर, अतुल भातखळकर, चित्रा वाघ यांच्यासह भाजपचे अनेक नेते आणि हजारो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ठिकाणी झालेल्या सभेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी भारतीय सेनेच्या पराक्रमाचे जाहीर कौतुक केले आणि पाकिस्तानला दिलेल्या कडक प्रत्युत्तराचा उल्लेख करत देशवासियांना अभिमानाची जाणीव करून दिली. नेमके काय म्हणाले देवेंद्र



फडणवीस? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ऑपरेश सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सेनेने दाखवून दिले, हमें कोई झुका नहीं सकता, हम ना झुकेंगे, न बिकेंगे, न थकेंगे अशा प्रकारे भारतीय सेनेची ताकद काय आहे? ही ताकद आपल्याला ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाहायला मिळाली. पहलगामध्ये आमच्या 25 बांधवांना ज्याप्रकारे धर्म विचारून मारण्यात आले. कुटुंबासमोर मारण्यात आले. बायकोसमोर नवऱ्याला मारले, मुलांसमोर बापाला मारले, अशा प्रकारचे बर्बरतापूर्ण हत्याकांड या भारताच्या नव्हे, तर जगाच्या इतिहासात अलिकडच्या काळात आपल्याला पाहायला मिळाले नव्हते. मोदींच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर हे लॉन्च केले. आमच्या भगिनींचे कुंकू पुसण्याचे काम ज्या दहशतवाद्यांनी आणि ज्या देशाने केले होते, त्याला नेस्तनाबूत करण्यासाठी ऑपरेशन सिंदूरची सुरुवात झाली. ऑपरेशन सिंदूरमध्ये अतिशय अचूक पद्धतीने भारतीय सैन्याने पाकिस्तानमध्ये घुसून आतंकवाद्यांचे 9 अड्डे उद्ध्वस्त करून टाकले, असे फडणवीस म्हणाले. मला सर्वात जास्त आनंद कशाचा असेल, तर ज्या ठिकाणी हरामखोर कसाबने प्रशिक्षण घेतले. तो अड्डा देखील नेस्तनाबूत करण्याचे काम केले. इतकेच नाही, तर आपल्या मुंबईचे अपराधी असलेले मकसूद अजहर, अबू जिंदल त्यांनाही ठोकण्याचे काम आपल्या सैन्याने केले. पाकिस्तानातील पंजाब प्रांतात शेवटच्या टोकाला जिथे त्यांना वाटायचे इथे कधीच भारतीय सेना पोहोचू शकत नाही. म्हणून सगळ्या आतंकवाद्यांना सगळ्या परिवारासह राहण्यासाठी जागा दिली होती. ज्या ठिकाणी या आतंकवाद्यांसाठी सेफ हाउस तयार केले होते.

# राज्य सरकारची शाळांसाठी नवी नियमावली

## सीसीटीव्ही लावणे, कर्मचा-यांची पार्श्वभूमी तपासणी अनिवार्य; नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई होणार

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

मुंबई : महाराष्ट्र शासनाने राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत एक नवीन नियमावली जाहीर केली आहे. या नियमांनुसार, प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, समुपदेशन सत्रांचे आयोजन करणे आणि शालेय कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी करणे आता अनिवार्य करण्यात आले आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या शाळांवर अनुदान थांबवणे किंवा मान्यता रद्द करणे यासारखी कारवाई केली जाऊ शकते.

गेल्या वर्षी ठाणे जिल्ह्यातील बदलापूर शहरात एका नामांकित शाळेत दोन चिमुकल्या विद्यार्थिनींवर झालेल्या अत्याचाराच्या धक्कादायक



घटनेनंतर, राज्यभरात विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात होती. त्या पार्श्वभूमीवर शाळांमध्ये सुरक्षा यंत्रणा अधिक बळकट करण्याचा निर्णय सरकारने घेतला. शालेय शिक्षण विभागाने 13 मे 2025 रोजी नव्या नियमावलीचा शासन निर्णय (जीआर) जारी करत शाळांसाठी काही कठोर आणि स्पष्ट निर्देश दिले आहेत.

### राज्य सरकारची शाळांसाठीची नियमावली काय?

- जीआर नुसार, 18 वर्षांखालील प्रत्येक व्यक्तीला 'अल्पवयीन' मानले जाणार आहे. शाळेच्या परिसरात कोणताही गुन्हा घडल्यास, त्याची माहिती तातडीने स्थानिक पोलिस स्टेशन किंवा विशेष बाल कल्याण पोलिस विभागाला देणे बंधनकारक असेल.
- सर्व शाळांमध्ये CCTV कॅमेरे बसवणे बंधनकारक आहे. या कॅमेऱ्यांचे फुटेज किमान एक महिना जतन करून ठेवावे लागणार आहे. नियमांचं पालन न केल्यास शाळेचं सरकारी अनुदान थांबवणे किंवा मान्यता रद्द करण्याची कारवाई केली जाऊ शकते, असा स्पष्ट इशारा शासनाने दिला आहे.
- शाळांनी सर्व कर्मचाऱ्यांची कसून पार्श्वभूमी तपासणी करावी. आवश्यक असल्यास चारित्र्य प्रमाणपत्र मागवावं. विशेषतः पूर्व-प्राथमिक ते इयत्ता सहावीपर्यंतच्या वर्गांमध्ये शक्यतो महिला शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत सुचवण्यात आले आहे.
- शाळेच्या बस असल्यास, त्यामधील चालक व इतर कर्मचाऱ्यांची नियमित अल्कोहोल टेस्ट करणे बंधनकारक आहे. प्रत्येक स्कूल बसमध्ये एक महिला कर्मचारी उपस्थित असावी, असेही जीआरमध्ये नमूद आहे.

# समाजाला गोपाल पाटील सारख्या सच्चा सेवकाची गरज -मठाधिश्वर श्रद्धेय जितेंद्रनाथ महाराज

## हजारो रुग्णांनी घेतला मोफत नेत्र तपासणी शिबिराचा लाभ : युवकांनी केले रक्तदान

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

दर्यापूर : आज प्रत्येक व्यक्ती आपल्या स्वतःच्या फायद्यासाठी जगत असून कोणालाही कोणाची दया येत नाही,आपल्या ताटात करे जास्त येईल असा विचार प्रत्येक व्यक्ती करत असताना अशा स्वार्थी जगत रुग्णसेवक म्हणून गोपाल पाटील अरबट निःस्वार्थी सेवा करत आहेत. त्यांना समाजातील चांगल्या लोकांनी साथ दिली पाहिजे व समाजाचे भले केले पाहिजे,असे प्रतिपादन अंजनगाव येथील देवनाथ पिठाचे प्रमुख जितेंद्रनाथ महाराज यांनी केले आहे.दर्यापूर येथील कृषी भवनात शिवसेना दर्यापूर तालुका व गोपाल पाटील अरबट मित्र परिवार यांच्या वतीने हजारोंच्या उपस्थितीत वाढदिवस अभिष्टचिंतन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आयोजित निःशुल्क रोगनिदान शिबिर व मोफत चष्मे वाटप शिबिराचा हजारो रुग्णांनी



लाभ घेतला व: युवकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. सावंगी मेघे रुणालयवर्धा येथील नामवंत तज्ञ डॉक्टरची टिम यावेळी उपस्थित होते.यामध्ये स्त्रीरोग तज्ञ,नाक काण घसा तज्ञ,हृदयरोग तज्ञ,शुगर बिपी,कर्क रोग अशा सर्व आजारावर रुग्णांना मोफत सल्ला देण्यात आला. तसेच डोळे तपासणी व मोफत चष्मे वाटप व मोफत औषधी वाटप करण्यात आले.यावेळी तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना सायकली,अपंगांना रिक्षा,महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.याप्रसंगी अमरावती जिल्ह्यातील सर्वच राजकीय सामाजिक पक्षाचे नेते, विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सर्व कार्यक्रमात अंजनगाव सुर्जी येथिल देवनाथ मठाचे मठाधिश्वर श्रद्धेय जितेंद्रनाथ महाराज यांची उपस्थिती व त्यांनी दिलेला बहुमुल्य वेळ व केलेले मार्गदर्शन गोपाल अरबट बद्दल कौतुकाची व कार्याची पावतीच प्रदाण करणारे होती.महाराजांनी आपल्या भाषणात गोपाल पाटिल अरबट यांचे व ते करीत असलेल्या कार्याचे तोंडभरुन कौतुक केले,ते म्हणाले की,गोपालला मी चांगला ओळखतो,गोपालची समाजसेवा व रुग्णसेवा वाखानन्यागी असुन गोपाल अरबट यांनी जो रुग्ण सेवेचा वसा घेतलेला आहे तो वसा म्हणजे प्रकारे गोपाल नारायण सेवाच करीत आहे. आज तालुक्याला गोपाल अरबट सारख्या तरुणाची गरज असुन आपण सर्वांनी त्याला साथ द्यावी असं आवाहन करुन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्यात.सोबतच गोपाल पाटील अरबट यांच्या अर्धांगिनी अश्विणी ताई यांची सुध्दा समाजकार्य करीत असताना गोपालला जी साथ मिळते ती कौतुकास्पद आहे असे उदगार महाराजांनी काढले.


या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवसेना उप तालुकाप्रमुख मनोज गव्हाणे व अश्विणी अरबट यांनी केले. याप्रसंगी शिवसेना संपर्क प्रमुख रवी गणोरकर,नव्याने प्रवेश घेतलेले सुनिल डिके,भाजपाचे मदन बायस्कार,भाजपा शहर प्रमुख मेघा भारती,शिवसेना जिल्हयातील महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी,वर्षाताई भोयर, संगिताताई मढावी,मायाताई देशमुख,कोमल बद्रे,जयश्री कातखिडे,अरुणा ईंगोले,रेखा खारोडे,सहसंपर्क रविंद्र गणोरकर, उपजिल्हाप्रमुख, रवी पवार सुनील केने भूषण नागे अमोल भुयार,तालुकाप्रमुख महेंद्र भांडे,नितीन चौखंडे, मंगेश काळमेघ, पंकज निंबोकार,उप तालुका प्रमुख मनोज गव्हाणे, विलास साखरे,राजू पोहकार मदत कक्ष प्रमुख सोनालीताई देशमुख गणेशराव गावंडे गणेशराव लाजूरकर,निरज नागे अमित ठाकरे गजेंद्र ढवळे नंदू निकोले कुलदीप ढेपे टिकू पाटील विनय गावंडे नागेश कांबे विजय तळोकार गजू चांदूरकर हेमंत उमाळे राहुल भुम्बर नंदकिशोर अरबट ज्ञानेश्वर अरबट नागोराव केणे शरद अरबट तुषार चौधरी संजय राणे सोपान वडतकर गोपाल तराळ सौरभ वायझाडे संजय राणे सागर गेठे शिवा उबरकर योगेश बुंदे शामभाऊ साखरे दिनेश पांडे सुधाकर फुलबरकर अशोक रेखे गजेंद्र राऊत डॉ पठाण, डॉ ठाकरें गणेश भाऊ साखरे सुभाष घाटे सतीश काळे अनिकेत कोळमकर भाष्कर धोटे रवी राजपूतपियुष माहुले भानदास सपकाळ प्रवीण मोपारी सचिन कोरडे शरद अरबट किशोर राऊत शेखर डहाकेआदी उपस्थित होते.

## ध्यान मुद्रेतील बुद्धरूपाची भिक्खू सघाच्या हस्ते स्थापना

मालेगाव : ध्यान भावना मुद्रेतील बुद्धरूप प्रतिबिंबाची स्थापना व धम्म परिषद कार्यक्रमाचे अध्यक्ष. पुज्य भिक्खु डॉ. एम सत्यपाल महाथेरो , विभाग प्रमुख मिलींद महाविद्यालय, संभाजी नगर (औरंगाबाद). कार्यक्रमाचे उद्घाटक. पुज्य भिक्खु ग्यानरक्षित थेरो , संभाजी नगर (औरंगाबाद), पुज्य भिक्खु दयानंद महाथेरो मुळावा,पुज्य भिक्खु धम्मधर थेरा, जालना , पुज्य भिक्खु प्रज्ञापाल थेरो, वाशिम. पुज्य भिक्खु नागमार्ग, राजगांव आदी भिक्खू संघाच्या हस्ते विधीवत पूजा व वंदना घेवून करण्यात आली आहे.

हे देखणे बुद्ध रूप प्रतिबिंब दानशुर बौध्दाचार्य , कैलास भिवाजी इंगळे व त्यांच्या परिवाराकडुन प्रदान करण्यात आले. थायलंड वरुन आणलेली अष्टधातुची सुवर्णलेप असलेली साडेचार फुट उंचीची तथागताची ध्यानमुद्रेतील आहे, तक्षशिला बुध्दविहार पंचशील नगर, मालेगांव भाग क्र. ३ येथे दानस्वरुपात देण्यात आली आहे.

तत्पूर्वी आज सकाळी सुशोभित सोनेरी अश्वारूढ अश्या वाहनात ठेवून बुद्धरुप बिंबाची शहर प्रदक्षिणा पूर्ण करण्यात आली, याप्रसंगी सर्वप्रथम सुधाकर पखाले यांनी त्यांची पुजा केली. यावेळी भिक्खू संघ, बौद्ध धम्मोपासक आणि धम्मोपासीका पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून या परिक्रमा यात्रेत सहभागी झाले होते. शहराच्या प्रमुख मार्गावरून, मुख्य बाजारपेठ मधून मार्गक्रमण करीत शहरातील पंचशील नगरात असलेल्या तक्षशिला बुद्ध विहाराच्या



परिवेणेत परत आणल्यावर विहारातील धम्मासनावर अधिष्ठान करून पुज्य भन्ते डॉ. एम सत्यपाल महाथेरो व इतर भिक्खू संघाला प्रथम हे बुद्धरुप बिंब विधीवत इंगळे परिवाराने सोपविले आणि मग तथागताच्या श्रावकसंघाने ते पालिगाथा च्या उच्चारवात त्याचे अनावरण करण्यात आले.

त्यानंतर धम्मपरिषदेच्या धम्मसनावर भिक्खू संघाची धम्मदेसना झाली. बौध्द धम्म परिषदेचे आयोजन केले आहे. या धम्म परिषदेला औरंगाबाद, नांदेड, मुळवा, जालना, वाशिम येथील विद्वान बौध्द भिक्षु उपस्थित होते. या बुद्धरूप प्रतिबिंब स्थापना समारंभाला समता सैनिक दल, सम्राट नवयुवक मंडळ, पंचशील नवयुवक मंडळ, भिमशक्ती नवयुवक मंडळ, रमाई महीला मंडळ यांचे भरीव सहकार्य मिळाले तर जेष्ठ बोध्दाचार्य ज्ञानबा वानखेडे, कैलास भिवाजी इंगळे, , रंजन घुगे, दिपक घुगे आणि आयोजन समितीचे सदस्य, महीला मंडळाच्या सदस्यांनी व उपसीका संघाच्या पदाधिकाऱ्यांनी उपासक वर्गाची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन भिक्खु ग्यानरक्षित थेरो यांनी तर आभारप्रदर्शन कैलास भीवाजी इंगळे यांनी केले.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY

वाशिम

GOOD MORNING



## बुद्ध पौर्णिमेनिमित्त पंचशील नगरात काढली विश्वशांती रॅली

जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांची २५६७ जयंती उत्साहात साजरी झाली. गत अडीच हजार वर्षांपूर्वी जगाला अहिंसेपासून दूर करण्याचे काम ज्या महामानवाने केले, त्या महामानवाची जयंती जगाच्या कानाकोपऱ्यात आनंदाने साजरी करण्यात आली. यंदाही पंचशील नगर ते भीम टेकडी सोमवारी सायंकाळी ७ वाजता विश्वशांती रॅली पंचशीलनगर ते भीम टेकडी येथे उत्साहात काढण्यात आली. पंचशील नगर येथून निघणाऱ्या रॅलीला खा. बळवंत वानखडे, माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमल गवई, पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी पंचशील ध्वज दाखवून रॅलीला प्रारंभ केला. रॅलीचे नेतृत्व भदंत शीलवंशकारा यांनी केले, तर रॅलीला प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभापती तथा नगरसेवक मंगेश मनोहरे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सचिव नयन मोंढे उपस्थित होते. विश्वशांती रॅली पंचशील नगर, वडरपुरा लुंबिनी नगर, संजय गांधी नगर नंबर २, यशोदा नगर नंबर २, मिनी बायपास, यशोदा नगर चौक उत्तम नगर, शांतीनगर मार्गे भीम टेकडी येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. विश्वशांती रॅलीत पंचशीलनगर येथील महिला, पुरुष हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. विश्वशांती रॅलीला यशस्वी करण्याकरिता पंचशील नगर येथील युवक मंडळींनी सहकार्य केले.

## संक्षिप्त



### बिटोडा भोयर रस्त्याचे काम तात्काळ सूरू करा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

**वाशिम :** बिटोडा भोयर रस्त्याचे काम येथील 25 15 मधील रोड चे काम गेल्या दोन वर्षापासून मंजुरात असून सुद्धा कंत्राटदार या रोडचं काम सुरू करत नाही गावातील नागरिकांना रोड मंजुरात असताना सुद्धा त्रास सहन करावा लागत आहे बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी हे सुद्धा या कामाकडे दुर्लक्ष करत आहेत दिनांक 13 5 2025 रोजी महाराष्ट्र निर्माण सेनेचे जिल्हा अध्यक्ष राजू पाटील किडसे यांच्या मार्गदर्शनात जिल्हा t3उपाध्यक्ष नरेंद्र भोयर यांच्या नेतृत्वात कार्यकारी अभियंता यांना निवेदन देण्यात आलेले आहे येत्या आठ दिवसांमध्ये बिटोडा भोयर येथील रस्त्याचे काम पुर्ण न झाल्यास महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने कार्यकारी अभियंता यांच्या चेंबरमध्ये ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने देण्यात आला आहे उपस्थित महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हा सचिव गजानन वैरागडे तालुका अध्यक्ष विठ्ठल राठोड वाहतूक सेना शहर अध्यक्ष उमेश टोलमारे वाहतूक सेना तालुका सहचिटणीस देविदास जैताडे. महाराष्ट्र सैनिक निखिल बुरकुले महाराष्ट्र सैनिक गोविंदा अवगण इत्यादी होते



### लक्ष्मीचंद कनिष्ठ महाविद्यालय शेलुबाजार येथे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

शेलुबाजार : येथील लक्ष्मीचंद महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विद्यालयातील सर्व कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्प अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली उपस्थित शिक्षकांनी त्यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकत त्यांचे विचार आत्मसात करण्याची अत्यंत गरज असून त्यांचे विचार आत्मसात करणे गरजेचे आहे व आजच्या युवकांमध्ये बदल घडणे हे महत्त्वाचे बाब आहे

### संबोधी वानखेडे अनुसूचित जाती समूहातून ९९ टक्के घेऊन जिल्ह्यात प्रथम

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

कारंजा : महाराष्ट्र शालांत परीक्षा संन २०२४-२ ५चा निकाल आज जाहीर झाला



असून त्यात जे डी विद्यामंदिर ची विद्यार्थिनी संबोधी संदीप वानखडे हिने ९९ टक्के गुण मिळउन अनुसूचित जाती समूहातून प्रथम येण्याचा बहुमान मिळविला आहे आई वडील शिक्षक असून घरातील शैक्षणिक वातावरणात राहून कुटुंबाच्या शैक्षणिक परंपरेचा वारसा संबोधी ने पुढे चालवीत आपल्या विद्यालयाचे आणि आई वडिलांचे नाव उज्वल केले आहे .वडील संदीप वानखेडे हे धाकली येथे माध्यमिक शाळेत विद्यादानाचे कार्य करीत असून आई प्राथमिक शिक्षिका आहे लहानपणापासून आपल्या आई वडिलांकडून शिक्षणाचे धडे मिळाल्याने हे यश मिळाल्याचे मत संबोधी हिने आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केले तिच्या या यशाबद्दल महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे जिल्हा अध्यक्ष बंडूभाऊ इंगोले, प्रा रामदास देवले, प्रा रामेश्वर भगत,प्रकाश पडघान, गौतम भगत,हरीश भगत ,केशव चव्हाण आदींनी तिचे अभिनंदन केले असून तिला पुढे अभियांत्रिकी शाखेत करिअर करायचे असल्याचे तिने सांगितले आहे

# गोकसावंगी येथे उन्हाळी भुईमूग शेती दिन व 'जलतारा' जागरूकता कार्यक्रम उत्साहात

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी




रिसोड : भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र, वाशिम (KVK Washim) तर्फे मालेगाव तालुक्यातील गोकसावंगी गावात 'तेलबिया आदर्श पिक गाव प्रात्यक्षिक कार्यक्रम' अंतर्गत उन्हाळी भुईमूग पिकाचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर दिनांक १४ मे २०२५ रोजी उन्हाळी भुईमूग शेती दिन आणि 'जलतारा' जलसंधारण जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोकसावंगी ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. वत्सलाताई बबन खुळे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. आर. एल. काळे आणि तालुका कृषी अधिकारी प्राजक्ता कुचेकर (BAO मालेगाव) उपस्थित होत्या. या कार्यक्रमात केव्हीकेचे विषयतज्ज्ञ डॉ. एस. के. देशमुख, टी. एस. देशमुख, डॉ. डी. एन. इंगोले, कृषी सहाय्यक रवी एकाडे, कृषीसखी सौ. खंडागळे, प्रगतिशील शेतकरी बबन खुळे व शरद खंडागळे यांची उपस्थिती लाभली. प्रथमरेषीय पीक प्रात्यक्षिक (FLD) हा संशोधक व शेतकरी यांच्यातील थेट संपर्काचा प्रभावी माध्यम असून, केव्हीकेचे तज्ज्ञ शेतकऱ्यांच्या शेतावर शिफारस केलेल्या तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करत प्रत्यक्ष अनुभव घेतात. या माध्यमातून तळागाळात पीक तंत्रज्ञान पोहोचते व उत्पादनक्षमतेत वाढ होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढीस लागते. कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रात डॉ. एस. के. देशमुख यांनी पीक प्रात्यक्षिक उद्दिष्ट स्पष्ट करत माती परीक्षण, संतुलित खत वापर व तंत्रज्ञानाच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर दिला. डॉ. आर. एल. काळे यांनी शेतकऱ्यांना शास्त्रीय व आधुनिक दृष्टिकोनातून पिके घेण्याचे आवाहन करत, शाश्वत शेती, एकात्मिक उत्पादन प्रणाली व प्रक्रिया मूल्यवर्धन यामार्गे उत्पन्नवाढीचे मार्ग सुचवले. तसेच, नव्या वाणांचे बियाणे संकलित करून स्वखर्चात बचत आणि इतर शेतकऱ्यांनाही सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्यानंतर सौ. प्राजक्ता कुचेकर यांनी जलसंधारणाच्या पारंपरिक व सुधारित तंत्रांची माहिती दिली आणि 'जलधारा अभियान' अंतर्गत उपस्थित शेतकऱ्यांकडून जलप्रतिज्ञा घेतली. टी. एस. देशमुख यांनी उन्हाळी भुईमूग पिकासाठी शिफारस केलेल्या तांत्रिक बाबी जसे की सुधारित वाणांचे बियाणे, खत व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण आदी मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. कृषी सहाय्यक रवी एकाडे यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देत बियाण्यांची उगम तपासणी (Seed Germination Test) पद्धतीचे प्रात्यक्षिक दाखवले. प्रगतिशील शेतकरी शरद खंडागळे यांनी त्यांच्या भुईमूग शेतीतील अनुभव शेअर करत TAG-73 या नवीन वाणाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला. शेवटी, उपस्थितांनी श्री. भालेराव यांच्या शेतातील TAG-73 वाणाच्या भुईमूग पीक प्रात्यक्षिक प्लॉटची प्रात्यक्षिक भेट घेतली. या कार्यक्रमाला गावातील अनेक प्रगतिशील व युवा शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन टी. एस. देशमुख यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. एस. के. देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. शिवाजी वाघ, प्रवीण जाधव व पिराजी जाधव यांचे विशेष योगदान लाभले.

## शिरसाळा गावात, मातृ दिन कार्यक्रम उत्साहात

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



मालेगाव : प्लान इंडिया, सेल्फ केयर फॉर न्यू मोम्स अँड किट्स अंडर 5 या प्रकल्प अंतर्गत, ग्रामपंचायत शिरसाळा गावात, बुद्ध विहार येथे मातृदिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

मातृ दिनानिमित्त गावातील माताना मातृ दिनाच्या शुभेच्छा देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला, विविध खेळ, गीतांच्या माध्यमातून महिलानी मातृदिनचा आनंद घेतला. कार्यक्रमात एकूण 85 + माता गर्भवती माता, स्तनदा माता, किशोरी मुली उपस्थित होते. कार्यक्रमाच्या दरम्यान मातांना आरोग्य पोषणाविषयी माहिती देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या .तसेच शारदा इंगोले, उपसरपंच, बेबी विजय इंगोले, ग्रामसंघ अध्यक्ष, संगीता रामचंद्र गायकवाड, SHG अध्यक्ष, उपस्थित होत्या व उपस्थित असलेल्या पाहुण्यांनी मातृ दिन बद्दल आपले मनोगत व्यक्त केले व मुलींनी आई वर सुंदर गीत प्रस्तुत केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गौरी गायकवाड, अशा कार्यकर्ता, व वैशाली जाधव प्रकल्पाचे ब्लॉक ऑफिसर भूषण कोल्हे व गुलाबी दीदी अंगणवाडी सेविका आरोग्य कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

## शेती नावावर करण्यासाठी सून आणि नातवाने वृद्ध महिलेला केली मारहाण

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

मालेगाव : तालुक्यातील एकांबा गावात एका ७० वर्षीय महिलेला तिच्या सून आणि नातवाने शेतजमीन त्यांच्या नावावर करून घेतल्याच्या कारणावरून मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या संदर्भात, एकांबा गावातील रहिवासी सोनाबाई उदयभान गवई (७०) यांनी त्यांची सून संगीता विलास गवई आणि नातू सिद्धार्थ विलास गवई यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, शुक्रवार, ९ मे रोजी सकाळी ७ वाजताच्या सुमारास सून संगीताने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली आणि शेती तिच्या नावावर करण्याची मागणी केली आणि तक्रारदाराच्या हातावर, पायावर आणि डोक्यावर काठीने हल्ला केला. तर नातू सिद्धार्थने तीला चापट आणि ठोसे मारले. जर शेती तिच्या नावावर केली नाही तर संगीता गवई यांनी त्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. या आधारावर, शिरपूर पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), ३(५) अंतर्गत गुन्हा क्रमांक २२०/२०२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास एसएचओ केशव वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिकारी बालाजी महाले करत आहेत.

## विजेचा धक्का बसून तीन गुरांचा मृत्यू

मालेगाव : विजेच्या तारेचा धक्का लागुण राजा किन्ही गावातील एका शेतात १२ मे रोजी दुपारी तीन गुरांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे, शेतकऱ्यांचे सुमारे २ लाख १० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. या प्रकरणातील मिळालेल्या माहितीनुसार, राजा किन्ही गावातील शेतकरी सूरज वैजनाथ अप्पा गोंडल यांच्या तीन गुरांना त्यांच्या लॉट नंबर २२४ मध्ये चरण्यासाठी नेण्यात आले होते. शेतात पडलेल्या वीज तारेच्या संपर्कात आल्यामुळे तिन्ही गुरांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर, गावातील पोलीस पाटील, पटवारी आणि वीज वितरण कंपनीचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले, त्यांनी पंचनामा केला.

## कर्जमुक्तीसाठी शेतकरी धडकले तहसील कार्यालयावर

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



मंगरूळपीर : निवडणूक काळात शेतकऱ्याचा सातबारा कोरा करू असे आश्वासन देऊन सत्तेत विराजमान झालेल्या महायुती सरकारला शेतकऱ्यांच्या वेदनांचा विसर पडला आहे. याचा पर्दाफाश राज्यातील करत शेतकऱ्यांना आम्ही कर्जमुक्त करू असा निर्धार घेऊन किसान ब्रिगेडच्यावतीने शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी अनेक शेतकऱ्यांनी अर्ज भरले असून त्या अनुषंगाने वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कर्जमाफीचे अर्ज भरून १४ मे रोजी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन दिले.

सदर निवेदनाचा आशय असा की,विधानसभा निवडणूक प्रचारदरम्यान महाविकास आघाडी,महायुती या दोन्ही आघाडीच्या वतीने आम्ही सत्तेत आल्याबरोबर शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू असे आश्वासन देण्यात आले होते. या आश्वासनावरच भोळ्या भाबड्या शेतकऱ्यांची मते घेऊन सत्तेत आल्यानंतर आम्ही कर्जमाफी करू असे म्हणालो नाही. अशी भाषा करण्यात आली. याचा शेतकरी कांही संघटनाकडून निषेध नोंदविण्यात आला. याला जुमानेल ते सरकार कसले, यावर मार्ग काढत किसान ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी किसान ब्रिगेडच्यावतीने राज्यभरात मागेल त्यालाच, गरज त्यालाच कर्जमुक्ती अंतर्गत किसान कर्जमुक्ती अर्ज भरणा सुरू केला. या मोहिमेत सामील होऊन वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी अर्ज भरून कर्जमुक्तीसाठी सरकारला भाग पाडू, असा इशारा किसान ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश पोहरे यांनी दिला आहे. तरी शेतकऱ्यांनी कर्जमुक्ती साठी अर्ज करण्यात आले आहे यावेळी शेतकरी नेते गजानन अमदाबादकर.किसान ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष नारायण आव्हाळे यासह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

# पाटणी चौकात अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू

## नागरिकांनी घेतला सुटकेचा निःश्वास

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



वाशिम : शहरातील वाहतुकीस अडथळा ठरत असलेल्या पाटणी चौकातील रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यासाठी १३ मेपासून नगरपरिषद, पोलीस आणि परिवहन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कारवाईला सुरुवात झाली आहे. या मोहिमेमुळे परिसरातील मुख्य रस्ता मोकळा झाला असून, नागरिकांनी यामुळे सुटकेचा श्वास घेतला आहे. पाटणी चौक परिसरात मोठ्या प्रमाणावर फेरीवाले, भाजी विक्रेते आणि इतर व्यापाऱ्यांचे अतिक्रमण वाढले होते. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता, तसेच अपघाताचा धोका देखील वाढला होता. संयुक्त कारवाईमुळे हे अतिक्रमण हटवण्यात यश आले असून, रस्त्यांची मोकळीक नागरिकांना जाणवू लागली आहे. दरम्यान, हटवण्यात आलेल्या फेरीवाल्यांना बालाजी मार्केट आणि महात्मा फुले मार्केट येथे पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. यापुढे कोणतेही स्थानिक व्यापारी किंवा फेरीवाले रस्त्यावर अतिक्रमण करत असल्यास, त्यांच्या विरुद्ध कायद्यानुसार कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही जोर धरू लागली आहे. वाशिम शहरातील पाटणी चौक परिसरामध्ये नेहमीसाठी रस्त्यावर होणारे व्यापारी फेरीवाल्याचे अतिक्रमण ही वादाची ठिणगी पडणारे आहे हे अतिक्रमण काढण्यात यावं अशी मागणी वारंवार जनता करत असताना त्याकडे संबंधित प्रशासन दुर्लक्ष करत आहे आणि त्याचा परिणाम 12 मे 2025 ला दोन गटात वाद झाला त्याचे पडसा शहरात उमटले याबाबत झालेल्या शांतता कमिटीच्या बैठकीत पाटणे चौकातील अतिक्रमण रस्त्यावरील हटवण्यात यावं जेणेकरून रस्ता मोकळा होईल आणि नागरिक सुटलेचा श्वास घेतील हि बाब प्रशासनाने घेरली पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी नगर परिषदेचे मुख्य अधिकारी गायकवाड व परिवहन विभाग वाशिम यांच्याशी संवाद केला आणि सायंकाळी पाच वाजता पासून अतिक्रमण सर्व शक्तीने सुरू झाली या कारवाईचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे ही मोहीम नेहमीसाठी असेच ठेवावे जेणेकरून शहरातील कायदा सुव्यवस्था आभाळत राहील.

## विमा अभिकर्त्याचा दुर्दैवी मृत्यू; दुचाकी अपघातात प्राण गमावले



नांदगाव पेठ : नांदगाव पेठ येथे मंगळवारी रात्री झालेल्या दुचाकी अपघातात कठोरा गांधी येथील विमा अभिकर्ता प्रवीण विनायकराव वानखडे (वय ४१) याचा दुर्दैवी मृत्यू झाला. रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास तो नांदगाव पेठ येथून आपल्या गावाकडे दुचाकीने जात असताना जिल्हा परिषद हायस्कुल समोरील रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात दुचाकी घसरली या अपघातात त्याच्या डोक्याला गंभीर इजा झाली होती.तब्बल दोन तास एकाच ठिकाणी पडून असल्याने व कोणतीही मदत न मिळाल्याने प्रवीणच्या डोक्यातून प्रचंड रक्तस्त्राव झाला व यामुळेच त्याचा जागीच मृत्यू झाला.

प्रवीण दररोज अमरावती किंवा बाहेरगावी जात असे. अश्यातच मंगळवारी सुद्धा प्रवीण सकाळीच आपल्या दुचाकीने घरून निघाला. रात्री नऊ वाजताच्या दरम्यान कठोरा जाणाऱ्या अन्य मित्रांनी त्याला भ्रमणध्वनी वरून संपर्क करत लवकर येण्याची विंनती केली मात्र त्याने तुम्ही समोर निघा मी लवकर येतो असे सांगितले. मित्र पुढे निघून गेले आणि प्रवीण साडे नऊ वाजताच्या दरम्यान नांदगाव पेठ वरून कठोरा गांधी कडे जात असतांना जि प. हायस्कूल समोर अचानक त्याची दुचाकी रस्त्याच्या खाली एका खड्ड्यात शिरली व संतुलन बिघडल्याने प्रवीणच्या डोक्याला गंभीर इजा झाली.

अपघातानंतर सुमारे दोन तास तो तेथेच पडून होता.रस्त्याने काळोख असल्यामुळे तो कुणालाही दिसला नाही त्यामुळे कुणी मदतीला धावले नाही दरम्यान रात्रपाळीवरील काही कामगारांनी त्यांना गंभीर अवस्थेत पाहून नांदगाव पेठ पोलीस स्टेशनला माहिती दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवले, मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांला मृत घोषित केले.

# विदर्भ केसरीच्या दणक्यामुळे गोठणगाव बस स्टॉपवरील स्पीडब्रेकर्सवर सुरक्षा खुणा उमटल्या

## समोर स्पीड लिमिटच्या बोर्ड पण लागला, प्रशासनाने घेतली दखल, पांढऱ्या पट्ट्यांनी चिन्हांकित केले गतिरोधक

**विदर्भ केसरी राजहंस शेंडे**







**कुही (गोठणगाव) :** गोठणगाव बस स्टॉपजवळील धोकादायक स्पीडब्रेकर्सवरून अनेक दिवसापासून नागरिक त्रास सहन करत होते. विदर्भ केसरीने याबाबत वारंवार लेखमालिका प्रसारित केल्यानंतर शेवटी प्रशासनाने या समस्येकडे दखल दिली आहे. आता या स्पीडब्रेकर्सवर पांढऱ्या रंगाच्या पट्ट्यांनी स्पष्ट चिन्हांकित करण्यात आले असून, "पुढे २० ची स्पीड आहे" अशी सूचना देणारी फलकेही लावण्यात आली आहेत.



**सुरक्षितता उपायांसह पूर्ण झाली मागणी :** आता रस्त्यावरील या गतिरोधकांवर पांढऱ्या रंगाचे पट्टे उमटले असून, समोर स्पीडब्रेकर येत आहे याची पूर्वसूचना देणारी बोर्डेही लावली आहेत. यामुळे रात्रीच्या वेळीही वाहनचालकांना योग्य तेवढ्या अंतरावरून गतिरोधकाची जाणीव होऊन वेग नियंत्रित करता येईल. गेल्या काही दिवसांत या ठिकाणी छोट्या-मोठ्या अपघातांचे प्रमाण वाढले होते, परंतु आता नागरिकांना योग्य तेवढी सुरक्षितता मिळाली आहे. स्थानिक नागरिक आणि वाहनचालक या बदलांनी आनंदी आहेत. गोठणगावमार्गे प्रवास करणारे पर्यटक आणि रहिवासी यांनी विदर्भ केसरीच्या प्रयत्नांचे कौतुक केले आहे. "हे बदल झाले ते केसरीमुळेच. आता रात्रीच्या वेळीही स्पीडब्रेकर दिसतात आणि अपघात टळतील," असे स्थानिक रहिवासी शंकर पाटील यांनी सांगितले.

NEWS IMPACT



तालुक्यातील इतर अनियमित स्पीडब्रेकर्सवरही योग्य चिन्हांकित करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी करण्यात येत आहे. विदर्भ केसरीच्या माध्यमातून या बाबतीत सतत दबाव राखण्यात येणार आहे. जनमाध्यमांचा आवाज जेव्हा प्रशासनाकडे पोहोचतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने लोकशाही जगते!

### केसरीच्या आवाजाला मिळाली प्रतिसाद

दैनिक विदर्भ केसरी ने गेल्या काही आठवड्यांत या ठिकाणच्या अनियमित आणि उंच स्पीडब्रेकर्समुळे होणाऱ्या अपघातांवर नियमित लेखन केले होते. वाहनचालक, सायकलस्वार आणि पादचारी यांना या गतिरोधकांमुळे होणाऱ्या त्रासांची पुनरावृत्ती करून, प्रशासनाकडे योग्य मार्किंग आणि सूचना फलक लावण्याची मागणी केली होती. पत्रकार राजहंस शेंडे यांनी या बाबतीत सतत दखल घेत प्रशासनाला पत्रके पाठवून कारवाईस भाग पाडले.

# से.फ.ला.हायस्कूलच्या राधिका चांडक, वैष्णवी भोगे तालुक्यातून प्रथम

## तालुक्यातील ३० शाळांचा निकाल ९४.३३ टक्के

**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन**



**धामणगाव रेल्वे :** तालुक्यातून से.फ.ला. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील राधिका विजय चांडक व वैष्णवी विजय भोगे यांनी समसमान ९७.२० टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तालुक्यातील एकंदर ३० शाळांचा निकाल ९४.३३ टक्के एवढा लागला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अमरावती विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी- मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर मंगळवारला (ता.१३) दुपारी १.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात आला.

तालुक्यातील एकंदर ३० शाळांचा निकाल ९४.३३ टक्के एवढा लागला आहे. यात तालुक्यातील सेफला हायस्कुलचा ९५ टक्के निकाल लागला आहे. श्री छत्रपती हायस्कुल ८७ टक्के, श्रीमती हिराबाई गोयनका शाळा ९९, माधवराव वानखडे विद्यालय विरूळ ६७ टक्के, नगर परिषद उर्दू हायस्कुल ९४ टक्के, स्व. नंदलाल लोया कन्या विद्यालय ९० टक्के, श्रीराम विद्यालय सोनेगाव खर्डा १०० टक्के, स्व.रामभाऊ गुल्हाणे माध्यमिक विद्यालय निंबोली ९५ टक्के, देवराव ठाकरे विद्यालय अशोकनगर ८८ टक्के, श्री कान्होजीबाबा विद्यालय अंजनसिंगी ८६, श्री संत शंकर महाराज विद्यामंदिर पिंपळखुटा ९० टक्के, जिल्हा परिषद हायस्कुल तळेगाव दशासर ९५ टक्के, प्रभात हायस्कुल वडगाव राजदि ९०, चंद्रभागाबाई पाकोडे विद्यालय मंगरूळ दस्तगीर ९३ टक्के, माध्यमिक कन्या विद्यालय तळेगाव दशासर १०० टक्के लागला आहे.

तसेच अशोक विद्यालय जळका पटाचे या शाळेचा ९० टक्के, कृषक विद्यालय निंभोरा बोडखा ८४ टक्के, अशोक विद्यालय जुना धामणगाव १०० टक्के, जिल्हा परिषद हायस्कुल झाडगाव ९१ टक्के, अशोक विद्यालय भातकुली रेणुकापूर १०० टक्के, एकता विद्यालय शेंदूरजना खुर्द ८७ टक्के, कृषक विद्यालय चिंचपूर ९२ टक्के, संतोषराव गोडे विद्यालय ९० टक्के, लाभचंद मूलचंद राठी विद्यामंदिर कावली ८६ टक्के, श्री साईबाबा विद्यालय अंजनसिंगी १०० टक्के, शासकीय निवासी मुलींची शाळा हिंगणगाव १०० टक्के, डॉ.मुकुंदराव के. पवार सैनिकी शाळेचा ९८ टक्के, आरोही डिजिटल स्कुल १०० टक्के, अंजनसिंगी येथील मदर टेरेसा शाळेचा १०० टक्के, कमलादेवी सिंघवी शाळेचा १०० टक्के निकाल लागला आहे.

# शमीम आजाद उर्दू गर्ल्स हायस्कूल निकाल 100 टक्के

**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन**




**दर्यापूर :** शहरातील लोकप्रिय शाळा शमीम आझाद उर्दू मुलींची हायस्कूल दर्यापूर, 100% निकालाचा विक्रम कायम ठेवत, यामध्ये अरहम फातेमा शेख अख्तरने 92.20% मिळवून शाळेत पहिला क्रमांक पटकावला, अनम फातेमा अब्दुल निसारने 91.80% मिळवून दुसरा क्रमांक पटकावला, अदीबा खानम शेख सलीमने 90.40% मिळवून तिसरा क्रमांक पटकावला. शिफा फातेमा अब्दुल गफूर यांना 87.80%, असफिया अनम रहमतुल्ला शाह यांना 86%, नशरा कशफ मोहम्मद अशफाक यांना 85.20%, अरस्ला साहेर सय्यद फारुक यांना 83%,अल्फिया परवीन मोहम्मद कलीम 81.80 %, आमेना उरूज अब्दुल रझीक 81.80% अतुफा अंजुम सय्यद शब्बीर 81%, तबिंदा महेक अब्दुल खालिक 80.40%, इशरा महरीन शेख इस्माईल 80%, गुण मिळाले, विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशाचे श्रेय आई आणि वडील, सोसायटीचे अध्यक्ष डॉ. मोहम्मद नासीर सर, मुख्याध्यापक मोहम्मद नायल मसीर सर, शिक्षक नसरीन खान, अन्वर फातेमा, अदनान खान सर, मोहम्मद काशिफ सर यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेत सन्मानित करण्यात आले आणि त्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिले.

# बुद्ध जयंती उत्साहात साजरी



**विदर्भ केसरी वृत्तसंकलन**

**खापरखेडा :** परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या निमित्याने १३ एप्रिल पासून १२ मे पर्यंत रैली, सांस्कृतिक, प्रबोधनात्मक, स्पर्धात्मक कार्यक्रम राबविण्यात आले. १० मे ला बक्षीस वितरण कार्यक्रम पार पडला याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा सुषमा बोरकर, सरपंच मीनाक्षी तागडे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी करणारे भन्ते नागवंश ताराचंद शेंडे, योगेश गजभिये, गोलू बागडे, राजेश खंडारे, गौरखेडे, नितनवरे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजीविनी मेश्राम यांनी केले, संचालन संगीता मेंढे तर आभार मोहोड यांनी मानले. बुद्ध जयंती प्रित्यर्थ सकाळी ध्वजारोहन, संपूर्ण परित्रण पठण करून खीर वाटप करण्यात आली तसेच सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत मोठ्या उत्सहात हजारोच्या संख्येत पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून हातात मोमंबत्ती प्रज्वलीत करून उपासक-उपासिका बुद्धम सरणंम गच्छामी उदघोष करीत "शांती रैली" सत्यशील बुद्ध विहार ते अण्णा मोड ते रेल्वे फाटक पर्यंत काढण्यात आली सत्यशील बुद्ध विहारात समारोप करण्यात आला सदर रैलीत महिला मंडळ व देखावे आकर्षणाचे केंद्र ठरले होते. सत्यशील बुद्ध विहार कमेटीचे अध्यक्ष मनोहर डोंगरे, सचिव श्याम गजभिये, कोश्याध्यक्ष- स्वप्निल खांडेकर, उपाध्यक्ष- राजेंद्र मेश्राम, रामराव मेश्राम, सहसचिव रवींद्र पाटील, नरेश पातावणे, सुरेश दिघे, भाऊराव बागडे, योगेश गजभिये, सिद्धार्थ सोनटक्के, दीक्षम डोंगरे, केवल मेंढे, संजीविनी मेश्राम, लता डोंगरे, प्रणिता डोंगरे, पल्लवी गजभिये, गीता पानतावणे, संगीता डोंगरे, शोभा हुमणे, वंदना ढोरे, हिना बागडे व खापरखेडा परिसरातील उपासक, उपासिका यांच्या अथक परिश्रमाने वरील सर्व कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. " शांती रैली " च्या समापना नंतर भोजनदान करण्यात आले.

# जोहरा इस्माईल ऊर्दू हायस्कूलचा निकाल ९२.५० टक्के



**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन, संग्रामपूर :** दहावीच्या परिक्षेत बावनबीर येथील महात्मा गांधी एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित जोहरा इस्माईल ऊर्दू हायस्कूलचा निकाल ९२.५० टक्के लागला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतल्याला या परिक्षेत शाळेतून ४० पैकी ३७ विध्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात मदिहा अनम काझी फहीमोद्दीन हिने ७८ टक्के गुण मिळवून शाळेत पहिला येण्याचा मान पटकावला. तर जझा फातेमा सैय्यद सदाकल अली हिने ७५ टक्के गुण मिळवून द्वितीय तर आलिया तबस्सुम शेख इरफान हिने ७१.४० टक्के गुण मिळवून तृतीय येण्याचा मान मिळवला आहे. यानिमित्ताने या तिन्ही गुणवंत यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार शाळेच्या वतीन मुख्याध्यापक सादीकउल्लाह खान यांच्याहस्ते पुष्पगुच्छ देउन करण्यात आला. याप्रसंगी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग उपस्थित होते.

# मातोश्री विद्यालय महागांव दहावीचा उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन**




**महागाव:** शेरखान पठान माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा 2024- 25 या शैक्षणिक सत्रामध्ये मातोश्री विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. मातोश्री इंग्लिश मेडीयमचा निकाल 100 टक्के लागला आहे. विद्यालयतून एकुण 203 विध्यार्थी प्रविष्ट झाले होते, प्रविष्ट विद्यार्थ्यांपैकी 37 विध्यार्थी 90 टक्के पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झाले तर 137 विध्यार्थी विशेष प्रविण्यास उत्तीर्ण झाले. मातोश्री माध्यमिक विद्यालयातून कु. प्राची सुनील पवार हिने 96.20 टक्के गुणासह विद्यालयातून प्रथम येण्याचा मान मिळवला तर वेदांत गजानन भांगे 96.00 टक्के गुणासह द्वितीय व कु. प्राची प्रकाश अडकिने हिने 94.80 टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळविला. मातोश्री इंग्लिश मीडियम विद्यालयातून कु. श्रावणी गणेश हिंगाडे हिने 95.00 गुण घेऊन विद्यालयातून प्रथम येण्याचा मान मिळवला तर कु. अनुष्का समाधान चौधरी हिने 94.40 गुणासह व कु. यशस्वी रेणूराव इंगळे हिने 94.40 टक्के गुणासह दोघींनी द्वितीय क्रमांक मिळविला. तर कु. प्रेरणा विजय देशमुख हिने 93.60 गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळवला. सर्व उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे मातोश्री शिक्षण संस्थेचे संस्थापक डी.पी.जगताप यांनी स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. सर्व स्तरात विद्यार्थी पालक व कर्मचारी वृंद यांचे कौतुक होत आहे.

# सौ. ज्योती बनकर-भुसारी यांचा साहित्यधारा संस्थेकडून 'आदर्श गायिका' म्हणून मानाचा सन्मान



**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन, भंडारा:** साहित्य, कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याची उदात्त परंपरा जतन करणाऱ्या छत्रपती संभाजीनगर येथील साहित्यधारा बहुउद्देशीय संस्थेने नुकताच एक भव्य सत्कार समारंभ आयोजित केला. या समारंभात विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्यात आला, ज्यात भंडारा जिल्ह्याच्या तुमसर येथील सुप्रसिद्ध गायिका सौ. ज्योती बनकर-भुसारी यांचा 'आदर्श गायिका' म्हणून केलेला गौरव विशेष लक्षवेधी ठरला. दिनांक ११ मे २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित या शानदार सोहळ्यात चित्रपट अभिनेते श्री. सतीश कुलकर्णी आणि समाज कल्याण सभापती सौ.जयश्री सोनकावळे यांच्यासारख्या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. साहित्यधारा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष डॉ. संघर्ष सावळे यांच्या कुशल नेतृत्वाखाली हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला. या प्रसंगी महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेल्या अनेक प्रतिष्ठित व्यक्तींचा यथोचित सत्कार करण्यात आला. नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सौ. ज्योती बनकर-भुसारी यांची 'आदर्श गायिका' म्हणून निवड होणे, हा भंडारा जिल्ह्यासाठी गौरवाचा क्षण आहे. तुमसर येथील प्रतिष्ठित श्री. भैय्यालालजी बनकर यांच्या त्या सून असून, त्यांच्या प्रेरणेमुळेच सौ. ज्योती यांना या संगीत क्षेत्रात यशस्वी पदार्पण करता आले. तसेच आई वडलांच्या माहेर घरी भंडारा जिल्ह्यातील पालांदूर या लहानशा गावातून त्यांच्या गायन कलेचा अंकुर फुलला आणि आज त्यांनी आपल्या सुमधुर आवाजाने भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर यांसारख्या अनेक जिल्ह्यांमध्ये श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले आहे. विविध सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमांमधून त्यांनी आपल्या कलेची प्रभावी छाप सोडली आहे. लहानपणापासूनच संगीताची आराधना करणाऱ्या सौ. ज्योती बनकर-भुसारी यांना साहित्यधारा संस्थेने दिलेल्या या सन्मानामुळे सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे. या यशाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना त्या म्हणाल्या, "माझे सासर आणि माहेर घरी आई- वडील आणि भाऊ यांच्या सततच्या पाठिंब्यामुळेच मी हे यश संपादन करू शकले. माझ्या सासरी "मला कधीही अशे जाणवले नाही की मी इथे सून म्हणून, फक्त घर संसार नांदायला आली नसून, मला त्यांनी माझ्या माहेरी आई, वडलांसारख स्वतः च्या मुली सारखं प्रेम दिलं. तसेच माझे पती विलास बनकर हे देखील नेहमीच माझ्या पाठीशी उभे राहतात तसेच सासरचा सुद्धा साथ मला या आज मिळालेल्या यशामागे खूप मोठा कारण असल्याचे सौ. ज्योती बनकर यांनी आभार प्रदर्शन करतानाही सांगितले.

# तब्बल तेरा वर्षानंतर भेट

**विदर्भ केसरी वृत्तसंकलन**



**सावनेर :** विद्यालयाचे दिवस संपले की प्रत्येकजण आपल्या करियरसाठी वेगवेगळ्या क्षेत्राकडे धाव घेतो मात्र ज्या विद्यालयात आपण शिकलो, घडलो, वेगवेगळ्या भागातील विद्यार्थ्यांबरोबर आपण मैत्रीचे नाते जोडले, ती नाळ मात्र 'तशीच असते.

पुन्हा एकदा भेटावे, सर्वासोबत हितगुज करावे असे सर्वानाच वाटते. पण प्रत्येकजणच आप आपल्या नोकरी- धंद्यात, संसारात व्यस्त असल्यामुळे ते सहजासहजी शक्य होत नाही. मात्र अशक्यही नसते, ज्या विद्यालयात आपण घडलो आयुष्य जगण्याचे तंत्र-मंत्र मिळाले, त्या विद्यालयातील पुन्हा एकदा त्याच विद्यार्थी मित्र- मैत्रिणीं सोबत पुन्हा 13 वर्षानंतर भेटण्याची संधी चालून आली. ती म्हणजे या स्नेह मिलन सोहळ्यामुळे. स्नेहमिलन सोहळातून 13 वर्षानंतर कॉलेज मित्राची भेट. गेल्या सात वर्षापासून सातत्याने आपल्या कॉलेज मित्रांची भेट व्हावी जुने दिवस जुने बालपण पुन्हा एकदा आपल्या डोळ्यासमोर दिसावं यासाठी 13 मार्च 2017 रोजी मिथुन उईके यांनी व्हाट्सअप ग्रुप तयार करून या कॉलेज मित्रांनी विखुरलेल्या मित्रांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.

सुरुवातीला पाच दहा जवळील मित्र जोडले हळूहळू मित्रांची संख्या वाढत गेली आणि आज तारखेत तब्बल 48 कॉलेज मित्र मैत्रिणीचा व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून एकत्र आले.. 2010/2012 ची कॉलेज बॅच डॉ हरिभाऊ आदमने कॉलेज जुन्या आठवणींना उजाळा मिळाला जुने मित्र पुन्हा एकदा भेटले! या भेटीने सर्वांना खूप आनंद झाला. अनेक वर्षानंतर भेटल्याने, त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि नवीन मैत्रीचे नातं अधिक घट्ट झाले. आयुष्याचा धावपळीत मागे राहिलेले क्षण पुन्हा एकदा जिवंत झाले. तब्बल 13 वर्षानंतर कॉलेज मित्र मैत्रिणी एकत्र आल्याने सावनेर शहरातील डॉ हरिभाऊ आदमने येथे स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात कॉलेज मित्र-मैत्रिणी जवळपास 40 ते 50 या मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 2010/2012 च्या बॅचमधील हे विद्यार्थी अनेक वर्षानंतर एकमेकांना भेटल्यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

चेहऱ्यावरील सुरकुत्या आणि बदललेल्या वेषातील आपल्या मित्र-मैत्रिणींना पाहून अनेकांना क्षणभर ओळखणेही कठीण झाले,पण हास्याच्या आणि गप्पांच्या ओघात सारे क्षणार्धात पुन्हा कॉलेज दिवसांमध्ये रमले. या स्नेहमेळाव्यात कॉलेज जीवनातील अनेक मजेदार किस्से आणि आठवणींना उजाळा देण्यात आला. कुणी शिक्षकांच्या सवयींचे अनुकरण केले, तर कुणी कॉलेजमधील गमतीजमती सांगून हशा पिकवला. तर संगीत खुर्ची सह अनेक खेळ, डान्स, संगीत खेळले तसेच अनेक वर्षानंतर भेटलेल्या मित्रांनी एकमेकांच्या कुटुंबाची आणि आतापर्यतच्या प्रवासाची माहिती घेतली.

भूतकाळातील आठवणींच्या साथीने भविष्यातील भेटीगाठींचे नियोजनही यावेळी करण्यात आले.. या कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्या सदस्यांनी सांगितले की, "आजच्या धावपळीच्या जीवनात मित्र-मैत्रिणींना एकत्र आणणे हे एक मोठे आव्हान होते. पण, सगळ्यांच्या मनात असलेली ओढ आणि एकत्र येण्याची इच्छाशक्ती यामुळेच हा मेळावा यशस्वी झाला. इतक्या वर्षानंतरही त्याच उत्साहाने आणि प्रेमाने भेटणे हा अनुभव खूप आनंददायी होता.. हा स्नेहमेळावा केवळ एक भेट नव्हती, तर भूतकाळातील सुंदर आठवणींना उजाळा देत वर्तमानातील नात्यांना अधिक घट्ट करणारा दुवा ठरला. या भेटीने सर्वांना पुन्हा एकदा त्यांच्या कॉलेज जीवनातील सोनेरी दिवसांची आठवण करून दिली आणि 'मैत्री या शब्दाचा खरा अर्थ पुन्हा एकदा अनुभवला. विनोद महाजन, अनिल डहाके सर यांनी प्रामुख्याने उपस्थिती दर्शवली. मान्यवर गुरुजनांचा येथो चित मानसन्मान पुढील वर्षी परत नव्या दमान भेटण्याचा संकल्प करीत एकमेकांचा निरोप घेतला हा स्नेहमिलन यशस्वी करण्यासाठी सर्व वर्गमित्रांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता अल्पोहारांनी करण्यात आली.

हा मैत्रीबंध संमेलन जितका उत्साही व जोश पूर्ण होता तेवढाच भावनिक ठरला पुढील वर्षी परत नव्या दमान भेटण्याचा संकल्प करीत एकमेकांचा निरोप घेतला हा स्नेहमिलन यशस्वी करण्यासाठी सर्व वर्गमित्रांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता अल्पोहारांनी करण्यात आली. यावेळी प्रा. अनिल डहाके प्रा. विनोद महाजन, हितेश बनसोड, स्वप्निल पारवे, राहुल बारई, पंकज गायधने, नाना जनबंधू, योगेश टोंगे, आशिष सोमकुवर, मिलिंद बोधे, संदीप सुरजुसे, अमित मेश्राम, विकास धुवाधपार, वसीम सहा, प्रमोद ताजने, दिनेश झेलगोंदे, सुरज सौदागर, रोशन गावंडे, रितू खोरगे, अश्विनी ठाकरे, मंजुषा सहारे,पदमा मरसकोल्हे, पपीता नारनवरे, प्रीती कापसे, प्रिया सोनेकर, रीना लांबट, शितल पलेरिया, सोनू मेहेत्रे, प्रगती चांदुरकर जया तांदूळकर आदी उपस्थित होते

# नागपूर जिल्हा

## प्रहार मिलिटरी स्कूलचा 100 टक्के निकाल

**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन**


**नागपूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाला असून, प्रहार मिलिटरी स्कूल, नागपूर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनिय यश संपादन केले आहे.

यंदाही शाळेचा एकूण निकाल १०० टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान पटकावून शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. 'प्रहार'मधील कार्तिक बोराडे याने ९२.८० टक्के मिळविले असून, जितेश आमने याने ८४.८० टक्के प्राप्त केले. चैतन्य सहारे याने ८१.२० टक्के, आर्य कीर्तीवार ७७.६० टक्के, तर रोहन श्रीरामे याने ७६.८० टक्के गुणांची प्राप्ती केली आहे.




विद्यार्थ्याच्या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष ॲड. अशोक बनसोड, उपाध्यक्ष भालचंद्र कागभट, सचिव विजय कागभट, मुख्याध्यापिका वंदना कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांसह शिक्षक व पालकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे. या यशामागे आमच्या विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि पालकांचा आधार आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांचे यश अधिक गौरवास्पद आहे. शाळेतील यशाबद्दल संपूर्ण प्रहार कुटुंब आनंदित असून, पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा, अशा भावना मुख्याध्यापिका वंदना कुलकर्णी यांनी व्यक्त केल्या.

## शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेचा निकाल १००%



**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन, खापरखेडा :** एसएससी बोर्डाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल १३ मे मंगळावर ला जाहीर झाला सदर एसएससी बोर्डाच्या परीक्षेत खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या वसाहतीत असलेल्या शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेच्या विद्यार्थ्यांनी गगनभरारी घेतली असून शाळेचा निकाल १००% लागला आहे त्यामूळे शाळेच्या मानेवर मानाचा तुर्रा लागला आहे. एसएससी च्या परीक्षेत एकूण ६३ विद्यार्थी बसले होते यात सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत प्रथम क्रमांक आकांशा मारोती बोरकर हिला ९५% गुण मिळाले आहेत तर द्वितीय मानसी सूरज धनवटे हिला ९३.४०% गुण मिळाले असून तृतीय क्रमांक प्रेम रामरतन बोरकर याला ९२.६०% गुण मिळाले आहेत संपूर्ण विद्यार्थ्यांपैकी ९०% च्या वर पाच विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे. एसएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव ईश्वर राऊत, प्रशांत जालंदर, गणेश चिखले, किशोर बक्सरिया, संध्या ठाकरे, सुनील जालंदर, मुख्याध्यापक विमालप्रकाश मिश्रा, मुख्याध्यापिका मोनाली सुरकर, चंद्रकांत मोहड, नरेंद्र बुटोलिया, प्रमोद इंगळे, दिलदार रामटेके, निरज मिश्रा, शिक्षिका कविता गोमकाळे, अनिता सोंगरवा, शुभांगी ठाकरे, शैलेंद्र रक्षित, रजनी वाहने, जवेरिया शेख, अर्पिता जालंदर, श्रद्धा लूटे, कविता निखाडे, आदींनी अभिनंदन केले आहे.

## जवाहरलाल नेहरू विद्यालय सावनेर, चा 100% निकाल

**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन**



**सावनेर :** स्थानिक जवाहरलाल नेहरू हायस्कुल यांनी आपल्या यशा ची परंपरा कायम ठेवत प्राविण्य श्रेणीत 25 तर प्रथम श्रेणीत 34 विध्यार्थी आले. विद्यालयातून नेहा प्रमोद पारधी 97.20 टक्के घेऊन प्रथम, नाजीया सौकत अली शेख 96.60% दुसरी, कृतिका प्रदीप भिंगारे 95.20% तृतीय आली. यशस्वी विध्यार्थी यांचे अभिनंदन पुष्पगुच्छ देऊन विद्यालयाचे पालक संचालक ॲड.चंद्रशेखर बरेठिया सर, मुख्याधपिका सौ.कमल बु-हाण मॅडम यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष रणजीतबाबू देशमुख, उपाध्यक्ष आमदार आशिषबाबू देशमुख ,कार्यवाह युवराजजी चालखोर साहेब, संस्थापक भाऊसाहेब भोगे यांनी शुभेच्छा दिल्या यावेळी मुख्याध्यापक सुधाकर गजभिये, जिजामाता विद्यालय खापा, जेष्ठ शिक्षिका वर्षा सोरते मॅडम, आरती पांडव मॅडम,अर्चना बनसिंगे मॅडम, रश्मी बन मॅडम, चंदा दुर्गे मॅडम उपस्थित होते.

## कागदोपत्राच्या अभावी घरकुल योजनेला नागरिकांकडून अल्प प्रतिसाद, येरखेडा न. प. ने केले लाभ घेण्याचे आव्हान

**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन**




येरखेड्यात काही नागरिकांनि ग्राम पंचायत असताना या योजनेचे लाभ घेण्यासाठी खोटी माहिती देऊन आखीव पत्रिकेवर नावाची बदल करून योजनेचा लाभ घेतला असला तरी या अडचणींचा तोडगा काढण्यासाठी शासनाकडून प्रयत्न करायला पाहिजे अशी मागणी होत आहे.

**कामठी:** काही महिन्यापूर्वी येरखेडा ग्राम पंचायतला नगर पंचायतचा दर्जा प्राप्त झाला असून मागील एक आठवड्यापासून नगर पंचायत द्वारे दवंडी च्या माध्यमातून नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेचा (घरकुल) लाभ घेण्याचे आव्हान करण्यात येत आहे परंतु आखीव पत्रिकेवर वर्तमान वेळेत अर्ज करणाऱ्याचे नाव नसल्याने तसेच आखीव पत्रिकेकर मृतकाचे नाव असल्याने गोर-गरीब जनतेला या योजनेचा लाभापासून वंचीत राहावे लागत आहे. कामठी तालुक्यातील काही महिन्यापर्यंत सर्वात मोठी ग्राम पंचायत असलेली येरखेडा हे जुने गाव आहे जरी हे गाव नगर परिषदेला लागून असले तरी आजही काही मोजक्या जुन्या परंपरा पाळल्या जातात जसे की विशेषत: गावपूजा, होय, आता मात्र या गावाचे शहरीकरण झाले असून मोठया प्रमाणात परिसराची वाढ झालेली आहे. ग्राम पंचायतिवर निवडून येणारे सरपंच यांना ले-आऊट च्या कामात जास्त अवैध मिळकत होत असे आता मात्र नगर पंचायत झालेली आहे काही वर्षापासून प्रधानमंत्री आवास योजना सुरु झाली असून या योजनेकरिता आखीव पत्रिकेवर अर्ज करणाऱ्या किव्वा लाभ घेणाऱ्या व्यक्तीचे नाव असणे बंधनकारक असल्याचे संबंधित विभाग सांगते, येरखेडा हे महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती पासून ग्राम पंचायत असल्याने जुने गाव आहे त्यावेळी ज्या घरच्या जुन्या लोकांच्या नावाने घर होते त्यांचेच नाव आजही आखीव पत्रिकेवर आहे, आता या जागेवर तिसऱ्या पिढीतील लोक वास्त्यव्य करीत आहे परंतु आजही आखीव पत्रिकेवर पहिल्याच पिढीचे नाव आहे ही वास्तविकता आहे आता वर्तमान वेळेत आखीव पत्रिकेवर नाव चढविण्याची तजबीज केली असता पहिल्या पिढीपासून ते तिसऱ्या पिढी पर्यंत वारसान चढविणे अवघड होत आहे.

म्हणूनच जेणे करून आखीव पत्रिकेवर नावे चढविण्यास विलंब होत आहे आणि याचा पर्याय सुद्धा अस्या लोकांकडे नाही दुसरीकडे आजच्या वेळी दोन भावाचे परिवार एकत्र राहू शकत नाही तर तीन पिढ्यातील सद्यस्यात समन्वय कसे जमणार आहे सांगायचे झाल्यास परिवारातील सद्यस्यात पटत नसल्याने किंवा समन्वय नसल्याने आजही अनेक आखीव पत्रिकेवर पहिल्या पिढीच्या नावे असलेल्या जागेवर तिसऱ्या पिढीचे लोक राहत आहे हे असे लोक आहेत की आजही कच्च्या घरात राहतात हातात काम नसल्याने या महागाईच्या युगात पक्के घर बांधने कसे शक्य होणार आहे. या योजनेत केंद्र सरकार कडून दीड तर राज्य शासनाकडून एक लाख रुपये दिल्या जात आहे,

या योजनेत सर्वात जास्त फायदा कुणाचा झाला असेल तर ले-आऊट मधील नागरिकांचा आवस्यकता नसतानाही ग्राम पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना हाताशी धरून योजनेचा लाभ घेण्यात आलेला आहे, गरजू लोकांना लाभ देने गरजेचे आहे, पण गरजू नसतानाही ले-आऊट टाकणारे प्लॉट विकताना प्रचार करत प्लॉटच्या ग्राहकांना सांगतात की घरकुल योजनेचा लाभ मिळवून दिल्या जाईल ते सांगतच नाही तर मिळवून ही देतात हे तेवढेच सत्य आहे.

## ग्रामपंचायत पचखेडी येथे १५ मे रोजी समाधान शिबीराचे आयोजन

### नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा- ग्रामपंचायतचा आग्रह

**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन, कुही/ पचखेडी :** शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत ग्रामपंचायत पचखेडी येथे दिनांक १५ मे २०२५ (गुरुवार) रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार असून, नागरिकांच्या समस्या आणि शासकीय कामकाजाशी संबंधित अडचणी सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. शिबिरात मिळणाऱ्या मुख्य सेवा पुढीलप्रमाणे: AgriStack योजनेअंतर्गत शेतकऱ्यांची नोंदणी रेशन कार्डसंदर्भातील दुरुस्ती – नाव समाविष्ट करणे, कमी करणे, दुय्यम रेशन कार्डासाठी अर्ज, विशेष सहाय्य योजना – श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजना व संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत KYC पडताळणी, शासकीय दाखले व प्रमाणपत्रे – विविध अर्ज व प्रमाणपत्रांचे वितरण, सातबारा उताऱ्यावरील नाव व क्षेत्र दुरुस्ती – अर्ज स्वीकारले जातील, तहसील कार्यालयाशी संबंधित इतर सेवा, या शिबिरामागील उद्देश म्हणजे नागरिकांना गावातच आवश्यक सेवा सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देणे होय. या उपक्रमाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामपंचायत पचखेडीचे सरपंच मा. विवेक मेश्राम, उपसरपंच दिलीप भोयर, ग्रामसेवक श्री. वाढीभस्मे, तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी केले आहे.

## जगाला युद्ध नको, बुद्ध हवा

### > अहिंसक अंगुलीमाला महानाट्याचा प्रयोग, बुद्ध जयंती उत्सव समितीचे आयोजन



**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन, नागपूर:** बुद्ध एक मानव होते, आणि त्यांना भीती देखील माहित होती. पण ते दररोज सजगतेचा सराव करायचे. आणि ते भीतीकडे बारकाईने पाहत होते. त्यामुळे जेव्हा त्याना अज्ञाताचा सामना करावा लागत होता, तेव्हा ते शांतपणे आणि शांततेने त्याचा सामना करू शकत होते. बुद्ध फिरायला जात असताना अंगुलीमाल, एक कुख्यात खुनी, त्यांच्यावर चालून आला. अंगुलीमालने बुद्धांना थांबण्यासाठी ओरडले, परंतु बुद्ध हळूहळू आणि शांतपणे चालत राहिले. अंगुलीमालने त्याना पकडले आणि ते का थांबला नाही हे जाणून घेण्याची मागणी केली. बुद्धांनी उत्तर दिले, 'अंगुलीमाल, मी खूप पूर्वी थांबलो होतो. तूच थांबला नाहीस.' तो पुढे म्हणाला, 'मी इतर सजीवांना दुःख देणारी कृत्ये करणे थांबवले आहे. सर्व सजीवांना जगायचे आहे. सर्वांना मृत्यूची भीती वाटते. आपण करुणेचे हृदय जोपासले पाहिजे आणि सर्व प्राण्यांचे जीवन वाचवले पाहिजे.' आश्चर्यचकित होऊन अंगुलीमालने अधिक जाणून घेण्यास सांगितले. संभाषणाच्या शेवटी, अंगुलीमालने पुन्हा कधीही हिंसक कृत्ये न करण्याची शपथ घेतली आणि भिक्षू होण्याचा निर्णय घेतला. खुनी व्यक्तीला तोंड देताना बुद्ध इतके शांत आणि निश्चिंत होते कारण त्यांना दया, क्षमा, शांती व मैत्री या चत:सूत्री वर विश्वास होता. अशोक जांभूळकर दिग्दर्शित अहिंसक अंगुलीमाल या महानाट्य चा प्रयोग तथागत गौतम बुद्ध यांच्या २५८८ व्या जयंती निमित्य, बुद्ध जयंती महोत्सव समिती, बुटीबोरी, सातगाव परिसर द्वारा आयोजित सार्वजनिक बुद्ध जयंती मेळाव्यात बुटीबोरी, येथील सिडको मैदानावर करण्यात आला. सध्या घडीला संपूर्ण जगात युद्धजन्य परिस्थिती आहे. आताच भरात व पाकिस्तान यांच्यात सुद्धा युद्ध झाले असून सगळीकडे धार्मिकतेचे स्तोम माजले आहे. अशा स्थितीत जगाला कुठलाही धर्म वाचऊ शकत नाही तर तथागताने दिलेला बुद्ध धम्मच तारू शकतो म्हणून जगाला युद्ध नको तर बुद्धच हवे आहे. युद्धकला, समाजकारण, राजकारण व नितीशास्त्रात पारंगत असलेला अहिंसक आपल्या गुरुच्या हट्टापायी व गुरुदक्षिणेत केलेल्या मागणीमुळे खुनी अंगुलीमाल कसा झाला?

## खा. बर्वेच्या हस्ते बौद्ध विहाराचे उदघाट्न व बुद्ध मूर्तिचे लोकार्पण

**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन, कामठी :** शहरालगतच्या येरखेड्यात भव्य पंचशील बुद्ध विहाराचे बुद्ध जयंतिला खा. श्यामकुमार बर्वे च्या हस्ते उदघाटन करण्यात आले तसेच बुद्ध मूर्तिचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमात माजी मंत्री सुनील केदार, जिल्हा परिषदेचे पूर्व उपाध्यक्ष सुरेश भोयर, येरखेडा ग्राम पंचायतीच्या पूर्व सरपंच सरिता रंगारी, पंचायत समिती सद्यस्य सुमेध रंगारी, राजेश बनसिंगे, मंदा महाल्ले, रोशनी भसमे, ज्योती घडले, प्रिया दुफारे, इमरान नईम, सय्यद गुफरान, धर्माजी बागडे, नवनित सहारे, चंद्रकांत गिरी, संदीप सुखदेव, विवेक गजभिये, बिट्टू मेश्राम, नरेश मोहोड, नरेश मोहोड, स्वप्नील गायकवाड, प्रामुख्याने उपस्तिथ होते, या कार्यक्रमाच्या सफलतेकरिता महिला मंडळ व उपासक, उपासिकानी परिश्रम घेतले

## सरोजनी पब्लिक स्कूल दवलामेटी च्या विद्यार्थ्यांचे शालांत परीक्षेत नेत्रदीपक सुयश

**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन**



**वाडी :** दवलामेटी, आठवा मैल स्थित, सरोजनी पब्लिक स्कूल शाळेचा शालांत परीक्षेचा निकाल 100% लागला. कु.चाहत मंगेश शेंडे या विद्यार्थिनी ने 84.40% मार्क मिळवून शाळेतून प्रथम येण्याचा मान पटकावला. कु.मृणाली महेश मदनकर ने 79% तसेच कु.रानू दिनेश गुरनूले ने 73.20% मार्क मिळवत द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. 4 विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत तसेच 7 विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. संदीप शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.पी. शशीधर सर, मान्यवर सभासद तसेच सदस्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, शाळेच्या मुख्याध्यापिका तसेच शिक्षकांचे कौतुक व हार्दिक अभिनंदन केले. सरोजनी पब्लिक स्कूल, आठवा मैल शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.मिनाक्षी काळबांडे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन करत पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा शालांत परीक्षेत विद्यार्थ्यांचे भरघोस सुयश

**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन**



**नागपूर :** दरवर्षीप्रमाणे यंदाही शाळेने आपली परंपरा कायम राखत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत भरघोस यश प्राप्त केले. शाळेचा निकाल 97 टक्के लागला असून प्राविण्यश्रेणीत 20 विद्यार्थी व प्रथम श्रेणीत 36 विद्यार्थ्यांना यश प्राप्त झाले. कुमारी श्रेया लांजे हिला 94% तर प्रणिता खापेकर हिला 91 टक्के गुण प्राप्त झाले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. रवींद्र फडणवीस, सौ सीमा फडणवीस शाळेच्या मुख्याध्यापिका सौ माया बमनोटे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापिका वंदना वनकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचाली करता विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## बी. आर. इंग्लिश मिडीयम हायस्कूल, काटोलचा नेत्रदीपक निकाल; हिना सुरजुसे प्रथम

**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन**



**काटोल :** येथील बी. आर. इंग्लिश मिडीयम हायस्कूलने इयत्ता दहावीच्या परीक्षेत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. यावर्षी शाळेचा निकाल शंभर टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीतही उल्लेखनीय यश मिळवले आहे. एकूण ४४ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे, तर १६ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे. यावर्षी झालेल्या दहावीच्या परीक्षेत शाळेची विद्यार्थिनी हिना प्रमोद सुरजुसे हिने ९६.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला आहे. निवेदिता हेमंत घोरसे हिने ९५.८० टक्के गुणांसह द्वितीय, तर अंतरा संजय कढे हिने ९३.४० टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकावला आहे. शंभर टक्के निकाल आणि मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवल्यामुळे शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये आनंदाची आणि उत्साहाची लाट पसरली आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अरुणा पवार यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. त्यांनी शिक्षकांच्या अथक परिश्रमाचे आणि विद्यार्थ्यांच्या कठोर मेहनतीचे कौतुक केले. या नेत्रदीपक यशाबद्दल शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. दिलीप चांडक, उपाध्यक्ष अशोक भुतडा, सचिव प्रकाश नबीरा, सहसचिव संकेत चांडक, कोषाध्यक्ष ओमप्रकाश अग्रवाल, सदस्य गिरीश लड्डा, नरेश घोडे, चेतन कढू, प्रतिक खोना आणि सर्व शिक्षकवृंदांनी गुणवत्ता यादीतील आणि प्रथम श्रेणीतील विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. या शानदार निकालामुळे शाळेच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एका सोनेरी पंखाची भर पडली आहे.

## उशिरा रात्री खैरी गावात मूर्ती स्थापना करणारे कौन?

### गुरुवारला सकाळी मूर्ती दिसताच पोलिसांना पाचारण

**विदर्भ केसरी, वृत्तसंकलन**



**कामठी :** कामठी तालुक्यात येणाऱ्या नागपूर रोड वरील खैरी गावात 14 मे च्या पहाटे उशिरा रात्री काही अज्ञातानी श्री छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती सिमेंट चा चौतरा बनवून स्थापित केली ही बाब सकाळी गावातील लोकांच्या निदर्शनास येताच गावात बोंबाबोंब झाली यांची लगेच सूचना जुने कामठी पोलीस स्टेशनला देण्यात आली सूचनेची शहानिशा करण्याकरिता जुने कामठी पोलीस स्टेशनचे पीआय प्रशांत जुमडे आपल्या कर्मचाऱ्यासोबत खैरी गावात पोहोचले असता गावात मूर्ती स्थापने वरून वातावरण तापले असल्याचे दिसून आले लगेच पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्यात आली. गावातील नागरिकांसह कामठी व आजू बाजू च्या गावच्या लोकांनी येण्यास सुरवात केली काहीनि तर वेगळे वळण देण्याच्या असफल प्रयत्न केल्याचे गावात बोलले जात होते वातावरण तापत असल्याचे पाहुन नवीन कामठी पोलीस स्टेशन che पीआय महेश अंधारे आपल्या कर्मचाऱ्यासोबत खैरी गावात पोहोचले मूर्तीचा विषय हा तहसीलदाराच्या अंतर्गत येत असल्याने सूचना देण्यात आली कामठी चे नायब तहसीलदार राजीव बमनोटे, कामठी विभागाचे सहायक पोलीस आयुक्त विशाल क्षीरसागर गावात पोहोचले, ग्राम पंचायत खैरी कार्यालयात तरुण पिढीचे युवकांनी मोठी गर्दी केली असल्याचे दुफारी दीड ते दोन च्या सुमारास दिसून आले. नायब तहसीलदारानी ग्राम पंचायत कार्यलयात काही गावकऱ्याची पोलीस अधिकाऱ्याच्या समक्ष बैठक घेऊन तोडगा काढण्याचा प्रयत्न देण्यात आला. तहसीलदारांनी सायंकाळ पर्यंत गावाकऱ्याशी सव्वाद साधून तोडगा काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. (खैरी गावाच्या महिला सरपंच योगिता किशोर धांडे यांनी सांगितले की 13 मे मंगळवार ला रात्री काही युवकांनी मूर्ती स्थापित करण्यात आलेल्या ठिकाणी वयोवृद्ध लोकांचा सत्कार करण्याचा कार्यक्रम आयोजित करून उशिरा रात्री काही युवकांनी बेकायदेशीर रित्या मूर्ती स्थापन केली आहे परंतु छत्रपती शिवाजी महाराज आमचे आराध्य दैवत आहेत त्यांची मूर्ती गावात बसविणे आनंदाची बाब आहे परंतु रीतसर संबंधित विभागाची परवानगी घेऊन ग्राम पंचायत हनुमान मंदीर च्या भव्य ग्राउंड परिसरात मूर्ती बसविण्यास सहकार्य करण्यास तयार आहे ज्यांनी कुणी रात्री मूर्ती स्थापन केली असावी ती जागा अल्पसी असल्याने तसेच बाजूला ये-जा करण्याचा रस्ता असल्याने सोयीस्कर होणार नाही आता 16 मे ला ग्राम सभा आयोजित करण्यात आली असून मूर्तीचा विषय सभेत ठेवण्यात येणार असल्याचे महिला सरपंच नि प्रतिनिधी सी बोलतांना सांगितले) नायब तहसीलदार राजीव बमनोटे यांनी सांगीतले की मूर्ती स्थापनेचा जागेचा व घटनेचा विषय पूर्णपणे ग्राम पंचायतचा असल्याने ग्राम पंचायत ला निर्णय घेण्याचा अधिकार आहे व होणाऱ्या ग्राम सभेत या विषयी गावातील नागरिकांचे मत जाणून ग्राम पंचायत निर्णय घेउ शकणार आहे.

## लग्नाच्या आठ दिवसापूर्वीच थांबविले दोन मुलीचे बालविवाह

### 24 तासात पोलीस करणार समिती कडे अल्पवईन मुलींना हजर

**विदर्भ केसरी वृत्तसंकलन**



**कामठी :** बालविवाह न करण्यासाठी शासनाकडून वेळो वेळी सतत जनजागृती होत असूनही आजही कवचित असे बाल विवाह होत असतात अशीच एक घटना कामठी नगर परिषद क्षेत्रात जुने कामठी पोलीस स्टेशनच्या हद्दीत मंगळवार ला दुफारी घडली यात एक नाही तर दोन 15 वर्षीय मुलीचे 22 मे ला होणारे लग्न नऊ दिवसापूर्वीच थांबविण्यात आले आता या दोन्ही अल्पवईन मुलींना जुने कामठी पोलिसांकडून बुधवारला बालविकास समिती समोर उभे केल्या जाणार आहे. सविस्तर असे की कामठीतील दोन पंधरा वर्षीय मुलीचे 22 मे गुरुवार ला लॉन मध्ये मोठा संभारंभ आयोजित करण्यात आला होता दोन्ही वधू व वराकडील लग्नाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचतो असताना यांची माहिती काही जागरूक व्यक्तीकडून जिल्हा बाल समिती कडे देण्यात आली असता मंगळवार ला दुफारी जिल्हा बाल संरक्षण पथकाने जुने कामठी पोलिसाच्या मदतीने मुलीच्या घरी भेट दिली असता घरील मंडळीने काही वेळ माहिती देण्यास विलंब केल्याने संबंधित अल्पवईन दोन्ही मुलीचे जन्म प्रमाण पत्र तपासले असता दोन्ही मुली पंधरा वर्षाचे असल्याचे निदर्शनास आल्याने मुलीच्या घरच्या लोकांची समजूत काढून मुलीचे 18 व मुलाचे 21 वर्ष वय असणे बांधणकारक असल्याचे सांगून तंवी पथ काने देताच वातावरण शांत झाले आता 24 तासाच्या आत पोलीस कर्मचारी समितीच्या सचिवा समोर दोन्ही मुलींना हजर करण्यात येणार आहे पथकामधे जिल्हा महिला बाल विकास अधिकारी रणजित कुरे, यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुश्ताक पठाण, जिल्हा बाल रक्षक समन्वय प्रश्नजीत गायकवाड, बाल विकास प्रकल्प अधिकारी अंजली निंबाळकर, पोलिस निरीक्षक प्रशांत जुमडे, संरक्षण अधिकारी साधना हटवार, मुख्य सेविका ज्योती निमजे, चायील्ड प्रतिनिधी मीनाक्षी धडाडे, ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट च्या शायना शेख, कैलास पडोळे, पोलीस उप निरीक्षक मिलिंद मेश्राम, रोशनी आखरे यांचा समावेश होता.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY GOOD MORNING | गुरुवार, १५ मे २०२५ | ७

# चंद्रपुर–गडचिरोली



## पाहिजेत

दैनिक विदर्भ केसरी वृत्तपत्रासाठी चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण तालुका प्रतिनिधी नेमणे आहे. पत्रकारिता क्षेत्राचे ज्ञान आणि आवड असलेले इच्छुक व्यक्तीनी खाली दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला बायोडेटा पाठवा आणि संपर्क करावे.

डी. एस. ख्वाजा, उप संपादक

मो. 9356446902 | Email : Khwaja00078@ gmail. Com

## शुल्लक कारणावरून समीर खंडाळे चा खुन

**विदर्भ केसरी, लखन मेश्राम**

**सावली :** तालुक्यातील केरोडा येथील समीर हरिदास खंडाळे 30 या युवकाचा निर्घृण खून शुल्लक कारणावरून करण्यात आल्याने परिसरात एकच खळबळ माजली आहे. त्यातील चारही आरोपींना अवघ्या पाच तासात अटक करण्यात सावली पोलिसांना यश आले आहे. सूत्राने दिलेल्या माहितीनुसार आरोपी अभय गिरीधर वालदे 22 रा. केरोडा हेटी याचे मृतक समीर खंडाळे याचे सोबत काल सायंकाळी आठ वाजताच्या सुमारास शुल्लक कारणावरून भांडण झाले.

त्याचा राग अनावर झाल्याने अभय वालदे याचे व्याहाड खुर्द येथील दोन मित्र पियुष सुरेश लाटेलवार १८ व एक सोळा वर्षीय विधी संघर्ष बालक यांना घेऊन तो आपल्या दुचाकीने परत केरोडा येथे आला. दरम्यान मृतकाच्या हातातील धारदार शस्त्र घेऊन विधी संघर्ष बालकांने मृतकाच्या छातीवर, पोटावर, आणि मांडीवर सपासप वार करून खून केला व पसार झाले.

या घटनेची माहिती सावली पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळावर पंचनामा करून पसार झालेल्या चारही आरोपींना अवघ्या पाच तासात अटक केली. यापैकी गिरीधर पत्रु वालदे ४२ राहणारा केरोडा हेटी हा घरीच सापडला, तर त्याचा मुलगा अभय गिरीधर वालदे 22 हा सायगाव तालुका ब्रह्मपुरी येथील आपल्या अत्याच्या घरी आढळून आला. आणि पियुष सुरेश लाटेवार व विधी संघर्ष बालक हे दुचाकीने जात असताना जाणाळ्या जवळ आढळून आले. चारही आरोपींवर



भारतीय न्याय संहिता 103 (1) 3 (5) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सावलीचे ठाणेदार प्रदीप पुल्लरवार, उपनिरीक्षक सचिन मुसळे, शिपाई धिरज पिदुरकर, मोहन दासरवार, विनोद वाघमारे, अशोक मडावी आदी करीत आहेत.

## सौ. वंदना विनोद बरडे सहायक अधीसेवीका महाराष्ट्र राज्य शासनाच्या राज्य स्तरीय फ्लॉरेंन्स नाईटिंगेल पुरस्काराने सन्मानित




**विदर्भ केसरी, वरोरा :**

नर्सिंग क्षेत्रातिल प्रतिष्ठीत समजला जाणारा महाराष्ट्र शासनाचा राज्य स्तरीय फ्लॉरेंन्स नाईटिंगेल आंतरराष्ट्रीय परिचारिका पुरस्कार वंदना विनोद बरडे सहायक अधीसेवीका ऊप जिल्हा रूग्णालय, वरोरा, जिल्हा चंद्रपूर यांना मा.प्रकाशजी आबीटकर सार्वजनिक आरोग्य मंत्री व खासदार धर्यशील माने यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. दिनांक १२ मे २०२५ ला राजश्री शाहू महाराज सभागृह, कोल्हापूर येथे महाराष्ट्र शासनाचा राज्य स्तरीय फ्लॉरेंन्स नाईटिंगेल नर्सेस पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते.


या कार्यक्रमासाठी मंचावर उपस्थित खासदार धर्यशल माने, प्रकाश आबिटकर सार्वजनिक आरोग्य मंत्री व कोल्हापूरचे पालकमंत्री, डॉ. नितीन आंबाडेकर संचालक आरोग्य सेवा मंडळ मुंबई, डॉ. पुरुषोत्तम मडावी उपसंचालक शुश्रुषा आरोग्य सेवा मंडळ मुंबई, डॉ. निलिमा सोनवणे सह. संचालक शुश्रुषा आरोग्य सेवा मुंबई ईत्यादी मान्यवर उपस्थित होते. यांच्या उपस्थित महाराष्ट्र शासनाचा राज्य स्तरीय सहा पुरस्काराचे वितरण करण्यात आले. त्यामध्ये वंदना विनोद बरडे सहायक अधीसेवीका ऊप जिल्हा रूग्णालय,वरोरा, जिल्हा चंद्रपूर यांना धर्यशिल माने खासदार व आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर व ईतर मान्यवरांच्या उपस्थितीत वंदना विनोद बरडे सहायक अधीसेवीका यांना प्रदान करण्यात आला.



## सावली वनपरिक्षेत्रात हत्तींची दहशत कायम

> पुन्हा दोन हत्तींचा विहीरगांव परिसरात प्रवेश, वारंवार हत्तींच्या प्रवेशाने शेतकऱ्यांना सतर्कतेचा ईशारा, वनविभागाकडे ठोस उपाययोजना नाही

**विदर्भ केसरी, लखन मेश्राम**



**सावली :** सावली वनपरिक्षेत्रातील विहीरगाव शेत शिवारात गडचिरोली जिल्ह्यातील रानटी हत्तींनी पुन्हा प्रवेश केल्याने विहीरगाव सह परिसरातील शेतक-यांमध्ये दहशत कायम आहे. दिनांक ९ में च्या रात्रो एकत्तीस हत्तींचा कळप विहीरगांवातील शेतक- यांच्या शेतात घुसून प्रचंड नासधुस केली व आल्या मार्गाने गडचिरोली जिल्ह्यात परत गेले. परंतु पुन्हा मंगळवारी रात्री एकच्या सुमारास दोन हत्ती वैनगंगा पार करुन विहीर गाव शिवारात प्रवेश करीत असल्याची माहीती मासेमारी करणाऱ्या भोई बांधव ज्ञानेश्वर नागापुरे व सहकारी यांनी गावक-यांना दिली. गावक-यांसह वनविभागाची टीम रात्रभर जागून हत्तींचा प्रवेश रोखण्याचा प्रयत्न करीत होते. प्रतीबंधात्मक उपाययोजना म्हणुन रात्रो मशाली पेटविण्यात आल्या, वाद्य वाजविणे, फटाक्यांचे आवाज करुन हत्तींना हुसकावण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. परंतु रात्रीच्या वेळी हत्तींचा होणारा प्रवेश रोखणे शक्य होत होत नाही. सदर परिसरातील शेतकऱ्यांना नेहमी हीस्त्र प्राण्यांच्या दहशती मध्ये शेती हंगाम करावं लागतं आहे. आत्ता पर्यंत मनुष्य हानी झाली नसली तरी धोका लक्षात घेता कायम उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे शेतकऱ्यां कडुन सांगितल्या जात आहे. मानव व वन्यजीव संघर्षाची घटना घडल्यानंतर वन विभाग विशेष लक्ष घालेल कां असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अशा घटनां टाळण्यासाठी वरीष्ठ पातळींवरून कोणत्याही प्रकारच्या निधीची तरतुद केली जात नसल्याने वन्यजिव व मानव संघर्ष टाळण्यासाठी सावली वनक्षेत्रात ठोस पावले उचलली जात नसल्याचे लक्षात येत आहे.वारंवार वन्य जीवांचा हस्तक्षेप मानवी वस्ती व शेत शिवारात होणे भविष्यात मोठ्या संघर्षाची नांदी ठरू शकतो याची काळजी वनविभागाने घेणे आवश्यक आहे. वारंवार हत्तींचा शिरकाव व वाघांचा भक्त संचार यामध्ये शेतीचा हंगाम करावा लागत असल्याने अशा परिस्थितीत शेतमजुरांच्या जिवीताची शेतक-यांत प्रचंड भीती व्यक्त केली जात आहे.


## दोन बूट, दोन जोड पायमोजे १७० रुपयांत कसे मिळणार?

### शाळा व्यवस्थापन समितीपुढे पेच, तर पालक संभ्रमात

**विदर्भ केसरी, नागेश इटेकर**

**गोंडपिपरी :** राज्य सासनाच्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत दोन गणवेश, दोन बूट आणि दोन जीड पायमोजे देण्याची योजना आहे. शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी योजनेचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र यंदा तरी हे साहित्य वेळेवर मिळेल की नाही,याबाबत शाळा व्यवस्थापन समिती आणि पालक संभ्रमात पडले आहेत. या योजनेअंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्यांना एका गण वेशासाठी ३०० तर बुट आणि पायमोजेसाठी १७० इतकी रक्कम शासनाकडून शाळा व्यवस्थापन समितीला दिली जाणार आहे. मात्र, केवळ १७० रुपयांमध्ये दोन जोड बूट व पायमोजे कसे दिले जातील, हा महत्त्वाचा प्रश्न शाळा व्यवस्थापन समितीपुढे उपस्थित राहत आहे.

गेल्या शैक्षणिक सत्रात मासनाने महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत गणवेश पुरवले होते, परंतु अर्धे सत्र संपल्यानंतरच विद्यार्थ्यांना ते मिळाले. त्यामुळे पालक व शिक्षणतज्ज्ञांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती,यात फेरबदल करून शासनाने यंदा शाळा व्यवस्थापन समितीमार्फतच साहित्य वितरणाचा निर्णय घेतला. त्यामुळे शालेय साहित्याचा दर्जा चांगला राहील अशी सर्व पालकांना अपेक्षा आहे.



### योजनेचे प्रमुख मुद्दे

पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत दोन गणवेश, दोन बूट आणि दोन पायमोजे.प्रत्येक विद्यार्थ्यांच्या साहित्याकरिता ४७० अनुदान, शाळा व्यवस्थापन समितीकडून साहित्याचे वितरण केले जाणार. मागील वर्षी गणवेश वितरणात विलंब झाला. या वर्षी तरी वेळेवर वितरण होणार का? अशी शंका व्यक्त केली जात असताना या बाबीला गांभीर्याने घेण्याची गरज आहे. कारण काही वर्षांपासून गणवेश आणि इतर साहित्य वेळेवर मिळत नसल्याने मुलांना गैरसोयीचा सामना करावा लागला. आता तरी वेळेवर सगळं मिळावं, अशी भावना अनेक पालकांनी व्यक्त केली आहे.

### अरुण चनफणे, गट विकास अधिकारी, पं. स. गोंडपिपरी

विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचा गणवेश उपलब्ध होणार आहे. या गणवेशाबरोबरच स्काऊट व गाईड विषयाशी सुसंगत स्कार्फ, स्काऊट बेरेट कॅप व वॉगल, तसेच भारत स्काऊट गाईड यांचे साहित्य देखील शाळा स्तरापर्यंतच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याचबरोबर राज्य शासनाद्वारे विद्यार्थी व विद्यार्थीनींना एक जोडी बूट व दोन जोडी पायमोजेही पुरविण्यात येणार असून याबाबतचा निधी देखील शाळा व्यवस्थापन समितीला प्रदान करण्यात आला आहे. शालेय गणवेशाचा पुरवठा विद्यार्थ्यांना लवकरात लवकर व्हावा, या उद्देशाने शासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे.

## गांजा विक्री करणाऱ्या एकास अटक



जिवती पोलिसांची दमदार कामगिरी

**विदर्भ केसरी, सय्यद शब्बीर जागीरदार, जिवती :**

तालुक्यातील कुंभेझरी येथील गांजाची तस्करी करणाऱ्या एका आरोपीला स्थानिक पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून सुमारे १२४५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आलेला आहे. अनिल पांडुरंग बसवंते (वय - ३६) रा.कुंभेझरी असे आरोपीचे नाव आहे. मौजा कुंभेझरी येथे राहणारा आरोपी अनिल पांडुरंग बसवंते हा आपले घरी अवैध रित्या गांजा बाळगून चिल्लर विक्री करीत आहे, अशी गोपनीय माहिती जिवती पोलिसांना मिळाली. सदर माहितीच्या आधारे आरोपीचे घराचे झडती करीता पोलीस अधीक्षक चंद्रपूर मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक रिना जनबंधू, उपविभागीय पोलिस अधिकारी गडचांदुर रवींद्र जाधव यांचे निदर्शनात पोलीस निरीक्षक कांचन पांडे, पोलीस अंमलदार जगदीश मुंडे, ज्ञानेश्वर डोकळे, किरण वाठोरे, अतूल कानवटे यांनी व दोन अब्रूदार पंचासमक्ष सदर आरोपीचे घराची घर झडती घेतली असता त्याचे घरातील किचन रूम मध्ये किचन ओट्याखाली एका कापडी पिशवीमध्ये एकूण १२४५ ग्रॅम वजन असलेला गांजा किंमत १२००० रू. मिळून आल्याने सदर आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन जिवती येथे अप क्र. ४३/२०२५ कलम २० (ब) गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिक १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्यात आरोपी नामे अनिल पांडुरंग बसवंते (वय - ३६) रा. कुंभेझरी अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा तपास पोलीस स्टेशन जिवती येथील पोलीस निरीक्षक कांचन पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक निलेश वाडीवा हे करीत आहेत.

## विवेक बोढे हे सेवेसाठी व्रतस्थ व्यक्तीमत्व! आमदार देवराव भोंगळे यांचे प्रतिपादन

### रुग्णसेवक विवेक बोढे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**विदर्भ केसरी, साहिल सैय्यद**

**घुग्घुस :** भाजपचे जिल्हा महामंत्री आणि आपल्या सेवाभावी कार्यासाठी ओळखले जाणारे व्यक्तीमत्व श्री. विवेक बोढे यांचा वाढदिवस ११ मे रोजी शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. केवळ औपचारिक सोहळा न करता, या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळ पासूनच भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांच्या घरी त्यांच्या शुभेच्छुकांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी गर्दी गेली होती. त्यांच्या घरी केक कापून त्यांना अनेकांनी शुभेच्छा दिल्या. शहरातील प्रत्येक प्रभागात भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांचा केक कापण्यात आला तसेच त्यांचे स्वागत करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. ऑटो व डग्गा संघटनेतर्फे बसस्थानक चौकात भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांचा केक कापून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या तसेच त्यांच्या वाढदिवसानिमित्त शीतपेयाचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ घुग्घुसतर्फे पत्रकार संघाच्या कार्यालयात पत्रकार बांधवांनी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांचा केक कापून वाढदिवस साजरा केला तसेच पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले आणि



वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सायंकाळी प्रयास सभागृहात भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या सत्कार समारंभाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी घुग्घुसचे भूमिपुत्र तथा राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार देवराव भोंगळे म्हणाले विवेक बोढे हे खरे रुग्णसेवक आहे त्यांनी अनेक अपघातग्रस्त युवकांचे प्राण वाचविले अपघातग्रस्तांना स्वतः आर्थिक मदत दिली तसेच अपघातात मृत्यू झालेल्या अनेक युवकांच्या कुटुंबियांना कंपनीतर्फे आर्थिक मोबदला मिळवून देण्यासाठी त्यांची महत्वाची भूमिका ही बाब अत्यंत प्रशंसनीय आहे. घुग्घुस येथील मा. ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्राच्या माध्यमातून शेकडो रुग्णांची तुकडी विविध आजारांवर उपचारासाठी व शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात रवाना केली. शहरात टँकरने नागरीकांना मोफत जलसेवा सेवा दिली त्यामुळे ते जलसेवक सुद्धा आहे. भाजपा जिल्हा महामंत्री यांच्या केक कापण्यात आला शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या सत्कार करण्यात आला व छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा विवेक बोढे यांना विवेक बोढे मित्रपरिवारतर्फे भेट देण्यात आली. याप्रसंगी आपल्या मनोगतामध्ये श्री. विवेक बोढे यांनी सर्वांचे आभार मानले आणि यापुढेही समाजासाठी कार्यरत राहण्याचा आपला मानस व्यक्त केला. त्यांचा वाढदिवस हा केवळ एक वैयक्तिक आनंदाचा क्षण न राहता, सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा ठरला. या कार्यक्रमाला चंद्रपूर महानगर भाजपाचे राहुल पावडे, भाजपाचे सुरेंद्र भोंगळे, अमोल थेरे, किरण बांदूरकर, गणेश कुटेमाटे, प्रमोद भोस्कर, महेश देवकते, इर्शाद कुरेशी, हेमराज बोंबले, वसंता भोंगळे, नितीन काळे, असगर खान, विनोद चौधरी, रत्नेश सिंग, सुरेंद्र भोंगळे, तुलसीदास ढवस, सचिन कोंडावार, श्रीकांत सावे, विवेक तिवारी, बबलू सातपुते, दिनेश बांगडे, अनिल मंत्रिवार, मधुकर मालेकर, चिन्नाजी नलभोगा, रवी चुने, निळकंठ नांदे, सिनू इसारप, धनराज पारखी, प्रयास सखी मंचच्या अर्चना भोंगळे, किरण बोढे, सुनंदा लिहीतकर, नितु चौधरी, सुचिता लुटे, पूजा दुर्गम व मोठया संख्येत नागरीक उपस्थित होते.

## संचमान्यतेबाबतचा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करण्यात यावा: आमदार सुधाकर अडबले

**विदर्भ केसरी, प्रल्हाद मेश्राम**

**देसाईगंज :** १५ मार्च २०२४ रोजीचा संचमान्यता बाबतचा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करण्याबाबत, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने १४ मे २०२५ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या कार्यालयासमोर एक दिवसीय विदर्भस्तरीय धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आमदार सुधाकर अडबाले यांनी मंत्रालयात शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकजजी भोयर, प्रधान सचिव रणजीत देओल, उपसचिव तुषार महाजन यांची भेट घेऊन विषयाची गंभीरता लक्षात आणून दिली. दि. २८ ऑगस्ट २०१५ च्या शासन निर्णयानुसार यापूर्वीचे संच निर्धारण होत होते. त्याप्रमाणेच शैक्षणिक सत्र २०२४-२५ चे संच निर्धारण करण्यात यावे व दि.१५ मार्च २०२४ रोजीचा शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करावा, या प्रमुख मागणीसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने झालेल्या धरणे/ निदर्शने आंदोलनाचे निवेदन आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षण राज्यमंत्री, सचिवांना दिले.



## जिवतीकरांच्या समस्यांवर तातडीने तोडगा

### खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या जनता दरबारात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**विदर्भ केसरी, चंद्रपूर:**

जिवती तालुक्यातील नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी आज, बुधवार दिनांक १४ मे २०२५ रोजी, पंचायत समिती जिवती येथे जनता दरबाराचे आयोजन केले होते. या दरबारात नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवत आपल्या समस्या मांडल्या आणि खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी अनेक समस्यांवर तातडीने तोडगा काढल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सकाळी ११:०० वाजता सुरू झालेल्या या जनता दरबारात रस्ते, वनहक्क, अनियमित वीजपुरवठा, आरोग्य सेवा यांसारख्या विविध विषयांवर नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्या. खासदार




प्रतिभाताई धानोरकर यांनी प्रत्येक तक्रारदाराचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकून घेतले आणि संबंधित अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधून योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. विशेष बाब म्हणजे, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या काही समस्यांवर जागेवरच तोडगा काढण्यात खासदार धानोरकर यांना यश आले. यामध्ये रस्ते दुरुस्तीच्या मागणीसाठी आलेल्या नागरिकांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी बोलून त्वरित कार्यवाही करण्याचे आश्वासन मिळाले. तसेच, वीजपुरवठ्यातील अडचणींबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून तात्काळ दुरुस्ती करण्याचे आदेश देण्यात आले. आरोग्य सेवेतील समस्यांवरही तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश आरोग्य विभागाला देण्यात आले. याव्यतिरिक्त, पाणीटंचाई आणि आरोग्य तसेच महावितरण संबंधित समस्यांवर जिल्हाधिकाऱ्यांसोबत स्वतंत्र बैठक घेणार असल्याचे खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी सांगितले. तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या सीमेवरील जिवती तालुक्यातील १२ गावांच्या सीमा प्रश्नावर केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. या महत्त्वपूर्ण जनता दरबारात काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार सुभाष धोटे, उपविभागीय अधिकारी माने, तहसीलदार रुपाली मोगरकर, माजी नगराध्यक्ष अरुण धोटे, माजी उपसभापती सुग्रीव गोतावडे, तालुका अध्यक्ष गणपत काळे, माजी नगराध्यक्ष डॉ. अंकुश



गोतावळे, नंदाताई मुसने, आरिफ शेख, लक्ष्मीनारायण ढोलके, डॉ. चिंचोळे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या यशस्वी जनता दरबाराबद्दल बोलताना खासदार प्रतिभाताई धानोरकर म्हणाल्या, "आज नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर तातडीने कार्यवाही करता आल्याचा मला खूप आनंद आहे. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी मी नेहमी तत्पर राहीन." या जनता दरबारात स्थानिक प्रशासनातील उच्च अधिकारी, पंचायत समिती सदस्य, विविध गावांतील सरपंच आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. नागरिकांनी खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या या थेट संवाद उपक्रमाचे कौतुक केले आणि आपल्या समस्या मांडण्यासाठी मिळालेल्या संधीबद्दल समाधान व्यक्त केले.

दैनिक **विदर्भ केसरी** विदर्भाचा मानबिंदू | TODAY GOOD MORNING | गुरुवार, १५ मे २०२५ | ८

# चंद्रपुर-गडचिरोली



## पाहिजेत

दैनिक विदर्भ केसरी वृत्तपत्रसाठी चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण तालुका प्रतिनिधी नेमणे आहे. पत्रकारिता क्षेत्राचे ज्ञान आणि आवड असलेले इच्छुक व्यक्तीनी खाली दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला बायोडेटा पाठवा आणि संपर्क करावे.

डी. एस. ख्वाजा, उप संपादक

मो. 9356446902 | Email : Khwaja00078@ gmail. Com

## महात्मा फुले विद्यालयातील विद्यार्थ्यांचा दहावीच्या परीक्षेत यशस्वी धडाका; निकालाचे सर्वत्र कौतुक

**विदर्भ केसरी, प्रफुल गेडाम**



**नागभीड :** अप्पर तालुका तळोधी (बा) येथील कल्याण शिक्षण संस्था, नागपूर द्वारा संचालीत महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तळोधी( बा) तालुका नागभीड यांनी यशाची परंपरा कायम राखत 88.57% चा उत्कृष्ट निकाल मिळविला आहे. संस्थापक अध्यक्ष कैलासवासी पंडित डॉ. तु. वी. गेडाम साहेब यांच्या प्रेरणेने विद्यालयाने पुन्हा एकदा आपले शैक्षणिक वैभव प्रसिद्ध केले आहे. यावर्षी विद्यालयातून 175 विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली. त्यापैकी 155 विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

यामध्ये 6 विद्यार्थी प्राविण श्रेणीत, 34 प्रथम श्रेणीत, 72 द्वितीय श्रेणीत आणि 43 पास श्रेणीत यशस्वी झाले. विद्यालयातून श्रुती राहुल माटे हिने 83.40% गुण मिळवून प्रथम स्थान पटकावले. तिच्यासह नुपूर ज्ञानेश्वर मेश्राम (83. 20%) अंशिता पुरुषोत्तम रामटेके (79.80%) यशस्वी विश्वेश्वर बोरकर (79. 00%) प्राची चंद्रशेखर पर्वते (77.40 %) आणि मेघना विलास लांजेवार ( 75.40%) यांनीही उत्कृष्ट गुण मिळविले. या यशानिमित्त विद्यालयात अभिनंदन सोहळा आयोजित करण्यात आला.

यावेळी कल्याण शिक्षण संस्था नागपूर चे अध्यक्ष मा. श्री. उन्मेषजी गेडाम साहेब, उपाध्यक्ष मा. डॉ. आर. एल. रत्नपारखी साहेब, सरचिटणीस मा.सौ. मालतीताई उन्मेषजी गेडाम मॅडम, चिटणीस मा. श्री. अनिलजी गायकवाड साहेब, मुख्याध्यापक मा. श्री.जे. जे. बुलबुले सर, उपमुख्याध्यापक मा. श्री.ए. एन. कोराने सर, पर्यवेक्षक मा. श्री.पी. एम. कोहपरे सर यांच्यासह सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आली.

विद्यार्थ्यांचे हे यश म्हणजे त्यांच्या मेहनतीसह शिक्षकांच्या समर्पित मार्गदर्शनाचे आणि पालकांच्या पाठबळाचे फलित आहे. आम्ही यापुढेही शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन उंची गाठण्यासाठी कटिबद्ध आहोत. असे अध्यक्ष श्री. उन्मेषजी गेडाम साहेब, सरचिटणीस सौ. मालती ताई उन्मेषजी गेडाम मॅडम, यांनी सांगितले. मुख्याध्यापक श्री.जी. जे. बुलबुले सर यांनीही विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत त्यांना त्यांच्या मेहनतीसह शिक्षकांच्या समर्पित मार्गदर्शनाचे आणि पालकांच्या पाठबळाचे फलित आहे.

आम्ही यापुढेही शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन उंची कटिबद्ध आहोत. असे अध्यक्ष श्री. उन्मेषजी गेडाम साहेब व सरचिटणीस सौ. मालतीताई उन्मेषजी गेडाम मॅडम यांनी सांगितले. मुख्याध्यापक श्री. जी. जे. बुलबुले सर यांनीही विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत त्यांना भविष्यातील यशासाठी शुभेच्छा दिल्या.हा निकाल विद्यालयाच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्तेचा पुरावा आहे. महात्मा फुले विद्यालयाने या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात आपले स्थान अधिक भक्कम केले आहे.

## रमाबाई आंबेडकर विद्यालयाचा तन्मय वाळके तालुक्यात प्रथम



**विदर्भ केसरी, लखन मेश्राम, सावली :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे च्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी (शालांत परीक्षा) मार्च/ एप्रिल २०२५ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून त्यात रमाबाई आंबेडकर विद्यालयाचा तन्मय किशोर वाळके ९२.६०(४६३ गुण) घेऊन तालुक्यात प्रथम स्थान मिळविले आहे. शरदचंद्र पवार विद्यालय व्याहाड खुर्द ची जागृती गोमाजी भजभुजे ९१.६०टक्के द्वितीय तर र .आ.वि चा आदित्य नेताजी बोरकर ९१.४० टक्के घेऊन तिसरा,वि.शा.वी ची भाग्यश्री डुमाजी गंडाटे ९१ टक्के चतुर्थ, वि.शा. वी.ची आश्वीनी लाटेलवार ९० टक्के घेऊन पाचवे स्थान मिळविले आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा तालुक्यातील विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवलेली आहे, तालुक्यातील विद्यालय निहाय निकालाची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे, विश्वशाति विद्यालय सावली ८०.२६ टक्के, रमाबाई आंबेडकर विद्यालय सावली९६.१७ टक्के, स्व.प्रविण भाऊ आडेपवार विद्यालय, निफंद्रा ९१.१७, शरदचंद्र पवार विद्यालय व्याहाड खुर्द ८३, सिध्दार्थ विद्यालय लोंढोली ७५, सुभाष चंद्र बोस विद्यालय सोनापूर १००, शहीद सुरेश पा.सुरकर विद्यालय कवठी १००, गुरुदेव विद्यालय जिबग़ाव ९७.५६, जिल्हा परिषद हायस्कूल पाथरी ७९.४५, इंदिरा गांधी विद्यालय पालेबारसा ९२.०६, याप्रमाणे तालुक्यातील विद्यालयाच्या निकालाची टक्केवारी आहे. रमाबाई आंबेडकर विद्यालयातून गुणवंत व उतीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष सौ. चंदाताई सुभाष गेडाम सर्व संचालक शिक्षक यानी अभिनंदन करीत पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.

## माउंट इंग्लिश मीडियम स्कूल बल्लारपूर च्या विद्यार्थ्यांचे चे सुयश



**विदर्भ केसरी, प्रेमचंद महतो, बल्लारपूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे द्वारा दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला. चंद्रपूर मल्टीपर्पज एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित माउंट इंग्लिश मीडियम स्कूल बल्लारपूर यांनी आपली उत्तम निकालाची परंपरा कायम ठेवत याही वर्षी ९१.१०% टक्के निकाल लागला आहे. माउंट इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यां नी नेत्र दीपक यश प्राप्त केले कुमारी रुची मनोज खैरे हिने ८३.८०% गुण प्राप्त करून शाळेतून प्रथम येण्याचा मान मिळवला. तर कुमारी अफशा अन्सार शेख हिने ८२.००% गुण प्राप्त करून शाळेतून द्वितीय क्रमांक येण्याचा मान पटकावला. तर तृतीय क्रमांक कुमारी सायली चंदू कांबळे हिने ७६.८०% गुण संपादन केले. मयंक विवेक कार्लेकर ७५.००% गुण प्राप्त करून शाळेतून चौथा आला. तर पाचव्या स्थानावर कुमारी सरिता प्रदीप देरकर हिने ७१.४०% व योहान राजेश मेश्राम याने ७१.४०% गुण प्राप्त केले. एस एस सी बोर्ड परीक्षेत शाळेतून २३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते यातून ४ विद्यार्थ्यांनी प्राविण्यासह गुण प्राप्त केले आणि ६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री भाऊराव झाडे तसेच संस्थेचे सचिव तथा शाळे चे प्राचार्य श्री शैलेश झाडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले तसेच अतिथी म्हणून हर्षल नवघरे, आकाश इन्स्टिट्यूट यांनी पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शाळेचे प्राध्यापक चेतन गाजर्लावार, प्राध्यापिका श्वेता व्यवहारे, प्राध्यापिका अर्चना अमराज, रमिज शेख, शिक्षक इतर कर्मचारी तथा पालक वर्ग उपस्थित होते.

## जगदंबा विद्यालय विहिगाव (कु.) येथिल दहावी निकाल 89.65% उत्कृष्ट निकाल



**विदर्भ केशरी, प्रा. भाग्यवान, आरमोरी :** तालुक्यातील विहीरगाव येथील जगदंबा विद्यालयातुन कु.पलक देविदास मडावी हिने 72.40% गुण घेऊन विद्यालयातुन प्रथम क्रमांक पटकावला आहे. कु.छकुली हरिश्चंद्र सेलोटे हीने64.40% गुण घेऊन व्दितीय क्रमांक पटकावला आहे तर कु.नंदिनी विनोद देशमुख हीने 63.20% गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक मा. भाग्यवानजी खोब्रागडे साहेब आणि मुख्याध्यापक मा. राजेंद्र मस्के उच्चं माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. लाखणकर प्रा. संदीप ढेंगरे तथा विद्यालयातील शिक्षक शिक्षेकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे पुष्पगुछ देऊन सत्कार व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिले.

## जवाहरलाल नेहरू विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय जोगीसाखरा चा निकाल 10वी 84.95%



**विदर्भ केसरी : रणजित बनकर आरमोरी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या वतीने 13 मे रोजी दहावीचा निकाल ऑनलाईन जाहीर करण्यात आला जवाहरलाल नेहरू विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय जोगीसाखरा शाळेचा एकूण निकाल 84.95 टक्के लागला आहे. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी शाळेच्या निकालाची उज्वल परंपरा कायम राखत शाळेचे नाव लौकिक केले. तसेच, प्रथम:- कु असुष्मिता देविदास प्रधान, 85.20%. द्वितीय:- वैभव दिलीप पत्रे, 83.00%. तृतीय:- नैतिक गुलाब मोहर्ले, 79.40%. चौथी :- कु. राखी जगदीश मैंद, 79.00%. पाचवा :- कु. तनिषा मनोहर दोणाडकर 78.60% सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे गुरुनानक सोशियल ट्रस्ट देसाईगज वडसा जवाहरलाल नेहरू विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालय जोगीसाखरा विद्यालय कडून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना खूप खूप शुभेच्छा श्री हिरा मोटवानी साहेब अध्यक्ष कांचन मोटवानी सदस्य व किशन मोटवानी यांनी सर्व प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

## ११ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत तर २६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

### श्रीराम विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालय कुरखेडा येथील विद्यार्थ्यांचा दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

**विदर्भ केसरी, पुंडलिक नागपूरकर, कुरखेडाः**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या वतीने १३ मे रोजी दहावीचा निकाल ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात असून यात श्रीराम विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालय कुरखेडा शाळेचा एकूण निकाल ९१.८१ % टक्के इतका लागला असून दहावी बोर्डाच्या परीक्षेत शाळेतील ११ विद्यार्थी प्राविण्यश्रेणीत उत्तीर्ण झाले असून 26 विद्यार्थी हे प्रथम श्रेणी उत्तीर्ण झाले आहेत परीक्षेला बसलेल्या एकूण 110 विद्यार्थ्यांपैकी 101 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत कुरखेडा तालुक्यामधून हर्षा माणिक गायकवाड या विद्यार्थिनीने ८९% प्राप्त करीत तालुक्यातून द्वितीय येण्याचा मान पटकावला आहे तर शाळेतुन द्वितीय क्रमांक अंबिका किशोर हीचामी या विद्यार्थिनीने ८५.८०% प्राप्त केला आहे तर तृतीय क्रमांक अभय खुशाल नलंगे या विद्यार्थ्यांनी ८४ % मिळवत शाळेमधून तृतीय येण्याचा मान पटकावला आहे.


सर्व विद्यार्थ्यांनी शाळेच्या निकालाची उज्वल परंपरा कायम राखत शाळेचे नाव लौकिक केले केल्याने यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्था कोषाध्यक्ष तथा शाळा समिती अध्यक्ष वामनराव फाये, संस्था सचिव दोषहरराव फाये संस्था सहसचिव तथा प्राचार्य नागेश्वर फाये, शाळा समिती सदस्य चांगदेव फाये, संस्था सदस्य गुणवंत फाये संस्था सदस्य हुंडीराज फाये, शिक्षक शरद कुमार कोडापे, संजय शिरपूवार, विलास मेश्राम डी.एम. नाकतोडे शिक्षिका लता राऊत व संस्थेचे पदाधिकारी व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले.

## भगवंतराव हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय टेकडा ताला चा 10 वी चा निकाल 84.61%



**विदर्भ केसरी, रवि बारसागंडी, सिरोंचा :** तालुकातील टेकडा ताल्ला भगंवतराव हायस्कूल टेकडा ताल्ला चे १० वी चा निकाल 84.61%, लागून असून विद्यार्थी जास्वंत कावरे 62.20% गुण घेऊन भगंवतराव हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय टेकडा ताला पाचवा क्रमांक आला. त्या विद्यार्थी ला दैनिक विदर्भ केसरी तर्फे पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आली.

## दहावी बोर्डाच्या परीक्षेचा निकाल; वैभव कॉन्व्हेन्टच्या विद्यार्थ्यांचे यश




**विदर्भ केसरी, प्रेमचंद महतो बल्लारपूर :** नुकताच दहावीचा निकाल जाहीर झाला आहे. विद्याप्रगती एज्युकेशन सोसायटी द्वारे संचालित वैभव कॉन्व्हेन्ट शाळेचा निकाल दरवर्षी प्रमाणे यावर्षी ही सर्वोत्तम लागला आहे. या वर्षी एकूण चाळीस विद्यार्थ्यांनी दहावी बोर्डाची परीक्षा दिलेली होती. शाळेतून प्रथम क्रमांक यामिनरजा आबिद अली सय्यद ९२.८०%, द्वितीय क्रमांक अजित रामबरण निषाद ९१.४०%, तृतीय क्रमांक चाहत शिवप्रसाद वर्मा ८३.६०%, चौथा क्रमांक अंकित अमरसिंग निषाद ८३.२०% व पाचव्या क्रमांकावर आलेख विरेंद्रसिन्हा भारद्वाज ७७.००% प्राप्त करून शाळेला गौरवान्वित केले आहे. या प्रसंगी शाळेचे संस्थापक हेमंत मानकर, सचिव रजिया खान, मुख्याध्यापक विजय शिंदे, मुख्याध्यापिका शबिस्ता सय्यद,शाळा व्यवस्थापन समिती सदस्या फरझाना शेख यांनी सर्व विद्यार्थ्यांना त्यांचा यशाबद्दल कौतुक केले व पुढील भविष्या साठी शुभेच्या देण्यात आल्या. वर्ग दहावीला शिकविणाऱ्या सर्व शिक्षकवर्ग यांच्या कार्याला प्रोत्साहन देण्यात आले.

## १०० दिवस कृती कार्यक्रम; देसाईगंज नगरपरिषदेची विभाग स्तरावरावर निवड

**विदर्भ केसरी, बाबू कुरेशी**

**देसाईगंज :** शासनाच्या १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत विविध लोकाभिमुख उपक्रम राबविण्यासोबतच प्रशासकीय कामकाजात गतिमानता राखण्यात देसाईगंज नगरपालिकेने आघाडी मिळविली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील 12 नगरपरिषदा/नगरपंचायती मधून विभागस्तरासाठी निवड झालेल्यात देसाईगंज एकमेव नगरपरिषद आहे. शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम देसाईगंज नगरपालिकेने यशस्वीपणे राबविला आहे. नगरपालिकेने या कालावधीत संकेतस्थळ अद्यावत करणे केले, विभागनिहाय तक्रार निवारण, कार्यालयीन सुशोभिकरण, अभ्यागतांसांठी तातडीने सुविधा असे विविध उपक्रम राबविले, शहरातील




महिला बचतगटांसाठी सोनचिरय्या उपक्रमाच्या माध्यमातून बाजारपेठ निर्माण करण्यात आली. उमेदच्या माध्यमातून कॉम्प्युटर प्रशिक्षण उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आले.

तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम अंतर्गत मुलांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, सामाजिक जाणिवा आणि सेवा भावना विकसित होण्यासाठी कब बुलबुल च्या माध्यमातून नगर परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्याद्वारे विविध उपक्रम राबविन्यात आले. कार्यालयातील स्वच्छतागृहे व कार्यालयीन स्वच्छता,मुदतबाह्य अभिलेख नष्ट करणे, तक्रार निवारण, लोकशाही दिन कार्यालयीन सोई-सुविधा, चौकशी कक्ष, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी, शाळांना भेटी असे विविध उपक्रम राबविण्यात आले. ई ऑफिस प्रणाली, अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, तंत्रज्ञानाचा वापर, अशा माध्यमातून अधिक गतिमानता वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामध्ये मुख्याधिकारी डॉ.कुलभूषण रामटेके यांचे महत्त्वाचे भूमिका असून नगरपालिकेचे इतर विभाग प्रमुख व कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतल्यामुळे हा कार्यक्रम यशस्वीपणे राबवण्यात मदत झाली व देसाईगंज नगरपरिषदेचे निवड विभाग स्तरावर करण्यात आली. नागपूर विभागातील 78 नगरपालिकेतून देसाईगंज नप ची अंतिम 6 मध्ये होऊन राज्य स्तरीय अभिनयात सामाविस्ट करण्यात येणार आहे.

## घरकुल लाभार्थ्यांना रेती मिळण्याचा मार्ग मोकळा

### शहरातील अतिक्रमण व सर्विस रोड सबंधित विषयावर चर्चा, जिल्हाधिकारी सोबत डॉ.मिलींद नरोटे यांची यशस्वी वाटाघाटी

**विदर्भ केसरी, फुलचंद वाघाडे**

**गडचिरोली :** गडचिरोली जिल्ह्यातील सामान्य कुटुंबातील नागरिकांना घरकुल अंतर्गत घर बांधकामासाठी रेती मिळण्यासाठी कठीण प्रसंगाला सामोरे जावे लागत होते. परिणामी सामान्य नागरिकांचे घर बांधकामाचे स्वप्न धुसर झालेले असतांना त्यांची गंभीर समस्या लक्षात घेऊन आमदार डॉ.मिलींद नरोटे यांनी जिल्हाधिकारी गडचिरोली यांचेशी प्रत्यक्ष चर्चा करुन घरकुल लाभार्थ्यांना रेती सहजतेने उपलब्ध व्हावी यासाठी यशस्वी वाटाघाटी करुन रेती मिळण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. आमदार डॉ.मिलींद नरोटे केलेल्या सततच्या प्रयत्नांची फलश्रुती सामान्य घरकुल लाभार्थ्यांना होत असल्याने सामान्य जनता आनंदीत असून घर बांधकामांचे



स्वप्न पूर्ण होत असल्याचा भाव त्यांच्या चेह-यावर दिसून येत आहे. सामान्य कुटुंबात जीवन व्यतीत करणा-या घरकुल लाभार्थ्यांना उद्यापासून रेती मिळणार असल्याने संबंधितांनी त्याचा लाभ घ्यावा व घर बांधकामाचे स्वप्न पूर्ण करावे असे आमदार डॉ.मिलींद नरोटे यांनी आवाहन केले आहे. यापुढे रेती घाटावरील रेती उचल करण्यासाठी कुठलीही अडचण येणार नाही. तसेच गडचिरोली शहरातील अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण हटविल्याने सामान्य दुकानदारांचे उदरनिर्वाहाचा प्रश्न आवासून उभा झालेला असल्याने संबंधित दुकानदार हवालदिल झालेले आहेत.त्यांचे कुटूंबावर उपासमारीची पाळी येऊ नये यासाठी जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा करुन संबंधित दुकानदारांना दुकान गाळे लवकरच उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

त्यामुळे अतिक्रमण धारक दुकानदारांना लवकर न्याय मिळणार आहे तसेच मेन हायवे ला लगत सर्विस रोड लोकांच्या सेवेसाठी लवकर उपलब्ध करण्यासंदर्भात चर्चा करुन नियोजन व निर्णय घेण्यात आलेले आहे. गडचिरोली शहरातील अतिक्रमणधारकांचे स्वप्न पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झालाआहे. जिल्हाधिकारी गडचिरोली यांचेसोबत आमदार डॉ.मिलींद नरोटे यांची विकास कामासंबंधाने यशस्वी चर्चा झालेली असल्याने सामान्य जनता व अतिक्रमण धारक दुकानदारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.


## कालेश्वर सरस्वती पुष्कर महोत्सवादरम्यान प्राणहिता नदी घाटावर सोयी- सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी

### सिरोंचा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सतीश जवाजी यांची मागणी

**विदर्भ केसरी, रवि बारसागंडी**

**सिरोंचा :** १५ ते २४ मे दरम्यान तेलंगणातील कालेश्वर येथे सरस्वती पुष्कर महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. दर १२ वर्षांतून एकदा येणाऱ्या या धार्मिक पर्वासाठी महाराष्ट्राच्या सीमेलगतच्या भागांतून मोठ्या प्रमाणावर भाविक कालेश्वर आणि प्राणहिता नदीच्या घाटावर दर्शन व पुण्यस्नानासाठी दाखल होणार आहेत.

या पार्श्वभूमीवर प्राणहिता नदी परिसरात भाविकांसाठी योग्य पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सतीश जवाजी यांनी केली आहे. सरस्वती पुष्कर मेळासाठी महाराष्ट्रातील हजारो भाविक या धार्मिक महोत्सवासाठी प्रवास करणार आहेत. प्राणहिता घाट हा



सीमावर्ती ठिकाणी असल्यामुळे येथेही भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. पुष्कर मेळानिमित्त पुण्यस्नानासाठी येणाऱ्या भाविकांना अडचण होऊ नये म्हणून 'पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालय सुविधा, वैद्यकीय मदत, आपत्कालीन सेवा, स्वच्छता, सार्वजनिक पथदिवे आणि वाहतूक नियंत्रण आदी गोष्टींची आवश्यकता आहे. याशिवाय घाट परिसरात स्वयंसेवक व सुरक्षा रक्षकांची नेमणूक, तसेच घाटाच्या सुरक्षिततेची योग्य ती काळजी घेणे गरजेचे आहे. या धार्मिक पर्वामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे धार्मिक पर्यटनाला प्रोत्साहन मिळेल आणि सामाजिक-सांस्कृतिक संवाद वाढेल. प्रशासनाने या पार्श्वभूमीवर योग्य ती पूर्वतयारी करून भाविकांसाठी आवश्यक सुविधा पुरवाव्यात,अशी मागणी काँग्रेस तालुकाध्यक्ष सतीश जवाजी यांनी केली आहे.

## तंबाखू तस्करीचा 'आका' कोण?

### तंबाखू तस्करीतून गडचिरोलीत शेकडो कोटींची उलाढाल? केलेली कारवाई संशयास्पद, गेल्या महिनाभरात दक्षिण गडचिरोलीतील अहेरी, आष्टी पोलीस हद्दीत कारवाई तरीही तस्करी सुरू

**विदर्भ केसरी, फुलचंद वाघाडे**

**गडचिरोली :** बंदी असतानाही गडचिरोली जिल्ह्यात सुगंधित तंबाखूचा सर्रास वापर नवीन नाही. मधल्या काळात पोलिसांनी याविरोधात कारवाई केली. लाखोंचा अवैध माल जप्त करीत तस्करांच्या मुसक्या आवळल्या. परंतु पकडण्यात आलेले आरोपी हे केवळ लहान तस्कर असून एटापल्ली आणि आरमोरी येथील मुख्य 'माफिया' अद्याप मोकाट असल्याने पोलिसांच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. विशेष म्हणजे कारवाईनंतरही दररोज छत्तीसगडवरून तंबाखू तस्करी सर्रास सुरू आहे.

गेल्या महिनाभरात दक्षिण गडचिरोलीतील अहेरी, आष्टी पोलीस हद्दीत कारवाई करीत पोलिसांनी तंबाखू तस्करांना अटक केली. यात लाखोंचा माल देखील जप्त केला. मात्र, या भागात तंबाखू तस्करी सुरूच असल्याने पोलिसांच्या कारवाईवर संशय व्यक्त केल्या जात आहे. छत्तीसगड आणि तेलंगणातून हा तंबाखू महाराष्ट्रात चोरट्या मार्गाने आणला जातो. गडचिरोली जिल्ह्यात तंबाखू तस्करीतून वर्षाकाठी २०० कोटींहून अधिकची उलाढाल होत असते, असे या व्यवसायात असलेले सांगतात. प्रामुख्याने सीमाभागातून तस्करीचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे मधल्या काळात कारवाई देखील वाढल्या. परंतु यात केवळ लहान तस्कर जाळ्यात अडकले मोठे मोकाट आहेत. जिल्ह्यातील एटापल्ली आणि आरमोरी या दोन शहरातून हे 'रॅकेट' चालते. यातून दोन 'तंबाखू माफिया' जन्माला आले आहे. दररोज लाखात होणारी कमाई हे यामागचे मुख्य कारण आहे. बेरोजगार, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मुलांना हाताशी घेत या दोघांनी तंबाखू तस्करीत आपले प्रस्त वाढवले.

### छत्तीसगड सीमेवर कारखाना; सर्वाधिक तंबाखूची खेप

छत्तीसगड वरून महाराष्ट्रात आणल्या जाते. तंबाखूच्या दर्जानुसार त्याचे वर्गीकरण करून ते वेगवेगळ्या डब्ब्यात बंद करून नंतर जिल्ह्यातील विविध भागात त्याची तस्करी केल्या जाते. ही प्रक्रिया करण्यासाठी गडचिरोली छत्तीसगड सीमेवर चक्क कारखाना सुरु करण्यात आला आहे. तो मागील काही वर्षपासून कार्यरत आहे. येथूनच मोठ्या प्रमाणात तस्करी होत असते. परंतु पोलिसांनी आत्तापर्यंत कारवाई करताना केवळ लहान तस्करांना जेरबंद केल्याचे चित्र आहे. काही दिवसांपूर्वी आलापल्ली येथे कारवाई करण्यात आली होती. त्यातील आरोपी फरार दाखवला होता. परंतु कारवाईच्या दुसऱ्याच दिवशी शहरातील लग्नात अनेकांनी त्याला पाहिले. तंबाखू तस्करीच्या मार्गावरील प्रत्येक पोलीस ठाण्यात लाखोंचा हप्ता जात असल्याची देखील जोरदार चर्चा आहे. त्यामुळेच मुख्य 'माफिया' आजपर्यंत मोकाट असल्याचीही चर्चा आहे.